# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | गुरुवार । दि. ९ जुलै २०२६ । अंक ३३ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


### फांदी पडून एकाचा मृत्यू

**खोपोली :** मुसळधार पावसामुळे खंडाळा घाटात रस्त्याच्या मधोमध मोठे झाड कोसळल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक सुरळीत करण्याच्या उद्देशाने झाड हटविण्याचे मदतकार्य सुरू असताना शिळफाटा येथील रहिवासी अमन मुजावर यांच्या अंगावर झाडाची मोठी फांदी कोसळल्याने त्यांचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, अमन मुजावर हे इतर नागरिकांसमवेत रस्त्यावर पडलेले झाड हटविण्याचे काम करत होते. त्याचवेळी झाडाची मोठी फांदी अचानक त्यांच्या अंगावर कोसळली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले.

### धोंडसे येथे दरड कोसळली

**पाली /बेणसे :** मुसळधार पावसामुळे सुधागड तालुक्यातील धोंडसे गाव ते स्मशानभूमी रस्त्यावर मोठी दरड कोसळल्याची घटना घडली. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती पाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी दिली. धोंडसे गावाजवळील टेकडीवरून माती आणि दगडांचा मोठा ढिगारा थेट रस्त्यावर येऊन पडला. दरड कोसळल्याने रस्त्यावर असलेला विजेचा खांबही कोसळला. विजेचा खांब कोसळल्यामुळे गावातील पाणीपुरवठा यंत्रणा बंद पडली असून पिण्याच्या पाण्याची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे.

## प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्याचा बळी

### शेकापच्या चित्रलेखा पाटील यांच्या मध्यस्थीनंतर प्रशासन नमले

### मृताच्या नातेवाईकाला मिळणार १५ लाखाची मदत

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

खानाव येथील पुलावरील भगदाडात पडून चांगू घरत यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी मृताच्या कुटुंबाला १५ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची ठाम भूमिका घेतली. यावेळी शेकापच्या चित्रलेखा पाटील यांनी घटनास्थळी धाव घेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला. अखेर प्रशासनाने माघार घेत उपअभियंता दिनेश पराते यांनी मृताच्या नातेवाईकांना १५ लाख रुपयांची मदत देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतरच ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यास सहमती दर्शविली.



खानावजवळील पुलामधील भगदाडात पडून ५५ वर्षीय चांगू घरत या शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणामुळे हा मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला. मृताच्या नातेवाईकांना १५ लाख रुपयांची भरपाई द्या, तरच मृतदेह शवविच्छेदनासाठी घेऊन जा, अशी भूमिका संतप्त ग्रामस्थांनी घेतली. त्यामुळे पोलीस प्रशासनासह बांधकाम विभागाची तारांबळ उडाली. प्रशासन निर्णय घेण्यास अपयशी ठरत होते. अखेर शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली. संबंधित विभागाचे अधिकारी पराते यांना धारेवर धरले.

पान २ वर

> दुर्घटना घडून कोणाचा तरी जीव जाईल, याबाबत प्रशासनाला लेखी तक्रार दिली होती. पण त्याकडे दुर्लक्ष केले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुजोर कारभारामुळेच एका निष्पाप शेतकऱ्याला जीव गमवावा लागला. मृत शेतकऱ्याच्या कुटुंबियांना मदत मिळण्यासाठी मृतदेह भर पावसात चार तास ठेवण्यात आला. हे प्रशासनाचे अपयश आहे. स्थानिक ग्रामस्थांबरोबरच शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाला नमते घ्यावे लागले, हे सत्य आहे. कार्यकारी अभियंता आणि ठेकेदार यांच्यावर गुन्हे दाखल होणे काळाची गरज आहे.
>
> – ॲड. राकेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते.



### कंपनीच्या अवजड वाहनांमुळेच भगदाड

गेल कंपनीच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाचे काम सुरु आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी लागणारे यंत्र सामुग्रीची वाहतूक खानावजवळी पुलावरूनच होते. हा पूल अरुंद होता. मात्र कंपनीच्या गाड्यांसाठी हा पूल रुंद करण्यात आला. क्षमतेपेक्षा अधिक वजनांची वाहने या रस्त्यावरून धावल्याने पुलाला भगदाड पडले. तसेच निकृष्ट दर्जाचे काम केल्याचा आरोप यावेळी ग्रामस्थांकडून करण्यात आला आहे.

### उपाययोजनांचा अभाव

अतिवृष्टीमुळे सोमवारी दुपारी खानावजवळील पुलाला भगदाड पडले. या पुलाच्या दोन्ही बाजूला बॅरीकेट लावले होते. ज्या ठिकाणी भगदाड पडले, त्याच रस्त्याची वाट पादचारी यांच्यासाठी मोकळी होती. योग्य उपाययोजना न केल्यानेच हा अपघात होऊन मृत्यू झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

### जि.प.सदस्याची बघ्याची भूमिका

वेळवली खानाव येथील ६५ वर्षीय चांगू घरत या वयोवृध्दाचे अपघाती निधन झाले. मयताच्या नातेवाईकांना भरपाई मिळावी, यासाठी ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली. मात्र जिल्हा परिषद सदस्यांनी केवळ बघ्याची भूमिका घेतल्याची चर्चा सुरु आहे. कामाचा ठेका पाहिजे असता, तर सार्वजनिक बांधकाम अधिकाऱ्यांना दहा वेळा फोन केला असता, अशीही चर्चा दबक्या आवाजात सुरू होती.

## वेधक

### पुण्यात इमारत कोसळली

**पिंपरी चिंचवड :** काही दिवसांपासून राज्याच्या विविध भागात मुसळधार पावसाचा कहर पहायला मिळत आहे. पुण्याच्या वेगवेगळ्या भागातही पावसाने कहर केला आहे. मोशी कचरा डेपोजवळ एक मोठी इमारत कोसळली. या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली जवळपास १४ जण अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच बचाव कार्य करण्यासाठी अग्निशमन दल घटनास्थळाकडे रवाना झाले. यामध्ये तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून आतमध्ये अडकलेल्या लोकांना वाचवण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते.

### ‘महायुती सरकार भ्रष्टाचारात बुडाले’

**मुंबई :** भाजपा महायुती सरकार भ्रष्टाचारात आकंठ बुडाले असून कंत्राटदार, ठेकेदार यांच्या माध्यमातून केवळ कमिशन खाण्याचे उद्योग सुरु आहेत. समृद्धी महामार्गात २० हजार कोटींचा भ्रष्टाचार झालेला आहे व तोच पैसा राजकीय पक्ष फोडण्यासाठी वापरला. या भ्रष्ट सरकारने त्यांच्या काळातील सर्व मोठ्या प्रकल्पांची श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. सहा दिवसात मुसळ-धार पाऊस पडून मोठे नुकसान झाले आहे. विविध घटनांमध्ये १२ पेक्षा जास्त व्यक्तींचा जीव गेला आहे. हे सर्व सरकारच्या भ्रष्ट कारभाराचे बळी आहेत. म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला पाहिजे, असेही ते म्हणाले.

### लोणावळा घाटात भूस्खलन

**कर्जत :** लोणावळा घाट विभागातील भूस्खलनानंतर झालेल्या भागात युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून मंगळवारी रात्री १०.५० च्या सुमारास मंकी हिल ठाकूरवाडी दरम्यानची मध्यम मार्गिका वाहतुकीसाठी सुरू करण्यात आली. या मार्गावर प्रतितास ३० किमी वेगमर्यादेने रेल्वेगाड्या चालवण्यात येत आहेत. त्यामुळे मुंबई-पुणे अप आणि डाऊन रेल्वेगाड्या धीम्यागतीने मार्गस्थ होत आहेत. दुरुस्तीच्या कामासाठी ४०० हून अधिक कर्मचारी आणि अभियंते, तसेच १० ते १२ जेसीबी तैनात करण्यात आली होती. रुळांवरील माती, दगड आणि झाडे हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होते. त्यानंतर सुमारे ४५ तासांनी मध्यम मार्गिका सुरू करण्यात मध्य रेल्वेला यश आले. उर्वरित मार्गिका सुरक्षित झाल्यानंतरच खुल्या करण्यात येणार असल्याची माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आली.

### पश्चिम आशियात पुन्हा तणाव!

**तेहरान :** पश्चिम आशियात पुन्हा एकदा युद्धाचं सावट निर्माण झालं आहे. होर्मुझ स्ट्रेटमध्ये ३ व्यावसायिक जहाजांवर झालेल्या हल्ल्यानंतर अमेरिकेने इराणच्या दक्षिण भागात सैन्य कारवाई सुरू केली आहे. अमेरिकेने स्ट्रेट ऑफ होर्मुझमधून जाणाऱ्या जहाजांना इशाराही जारी केला आहे. त्यामुळे होर्मुझ स्ट्रेटमधील वाहतूक पुन्हा विस्कळीत होण्याची भीती वर्तवली जात आहे. ज्यांना उपचारासाठी हॉस्पिटलला दाखल करण्यात आले आहे. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर संयुक्त सागरी माहिती केंद्राने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या जहाजांसाठी गंभीर धोक्याचा इशारा दिला आहे. पुन्हा एकदा युद्धाचे ढग पश्चिम आशियात दिसत आहेत.

## गावठाणाचा विकास, विस्थापितांचा वनवास!

### जेएनपीए प्रशासनाविरोधात गंभीर आरोप; एसआयटी चौकशीची मागणी

**। उरण । विठ्ठल ममताबादे ।**

शेवा व कोळीवाडा येथील ६२० विस्थापित कुटुंबांना चार दशकांनंतरही पुनर्वसनाचा न्याय मिळालेला नसताना, त्यांच्या मूळ गावठाणावर तब्बल १३.१४ कोटी रुपयांची उद्याने, मंदिरांचा जीर्णोद्धार आणि सुशोभीकरणाची कामे सुरू झाल्याचा आरोप करत विस्थापितांनी जेएनपीए आणि संबंधित महसूल प्रशासनाविरोधात गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. कथित बनावट सरकारी आज्ञापत्रांच्या आधारे पुनर्वसनाचा प्रश्न जाणीवपूर्वक रखडविण्यात आल्याचा दावा करत संपूर्ण प्रकरणाची विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



विस्थापितांच्या म्हणण्यानुसार, शेवा बेटावरील सुमारे ८०० हेक्टर सुपीक शेती, पारंपरिक मासेमारी क्षेत्र आणि गावठाणावर शेकडो कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून होता. २१ जून १९८४ रोजी शासनाने शेवा व कोळीवाडा गावठाणातील ७.२१ हेक्टर जमीन संपादनाची अधिसूचना काढली होती. मात्र, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), उरण यांनी २४ जून २०२६ रोजी माहिती अधिकारांतर्गत दिलेल्या उत्तरात संबंधित जमीन आजतागायत संपादित झालेली नसल्याची लेखी माहिती दिल्याचा दावा विस्थापितांनी केला आहे.

याउलट, १७ फेब्रुवारी आणि १७ मार्च १९९० रोजी काढण्यात आलेल्या दोन सरकारी आज्ञापत्रांमध्ये शेवा व कोळीवाडा गावठाण विनामूल्य संपादित करून त्याबदल्यात बोरीपाखाडी व बोकडविरा येथे पर्यायी जमीन देण्यात आल्याचा उल्लेख आहे. ही दोन्ही आज्ञापत्रे बनावट असल्याचा आरोप करत त्याच आधारे गेली ४० वर्षे ६२० कुटुंबांची दिशाभूल करण्यात आली आणि त्यांना पुनर्वसनापासून वंचित ठेवण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

पान २ वर

## बेलवड्यात डोंगर सरकले, घरांना भेगा

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील बेलवडे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत मुसळधार पावसाने डोंगराळ भाग धोक्याच्या उंबरठ्यावर आणला आहे. बेंदीचीवाडीतील आदिवासीवाडी आणि मुंगोशी परिसरात डोंगराला मोठमोठे तडे गेल्याने दरड कोसळण्याचा गंभीर धोका निर्माण झाला असून अनेक घरांना भेगा पडल्या आहेत. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी २८ कुटुंबांतील सुमारे ८० ते ८५ नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. मात्र एवढी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही एकही शासकीय अधिकारी घटनास्थळी पोहोचला नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी करत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.



- बेंदीचीवाडी आदिवासीवाडी व मुंगोशी धोक्याच्या छायेत; २८ कुटुंबांचे स्थलांतर

गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बेंदीचीवाडी परिसरातील डोंगराला मोठ्या प्रमाणात तडे गेले असून, वडाचा दांड-शोळे मार्गालाही भेगा पडल्या आहेत. अनेक ठिकाणी जमीन सरकल्याचे स्पष्ट दिसत असून डोंगरातून दगड घसरत असल्याने परिसरातील नागरिक भीतीच्या छायेत आहेत. मुंगोशी परिसरातही दरड कोसळल्याने धोका अधिक वाढला आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन बेलवडे ग्रुप

पान २ वर

### पाण्यात बुडून एकाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** भेकरेवाडी, शिरवली गाव परिसरात मित्रांसोबत फिरायला गेलेला तरुण पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याची घटना मंगळवारी (दि.७) घडली. या तरुणाचा विविध ठिकाणी नदीपात्रात शोध घेतला जात आहे. मयूर पाटील हा त्याच्या पाच ते सहा मित्रांसोबत भेकरेवाडी, शिरवली गाव परिसरात फिरण्यासाठी गेला होता. यावेळी ते पाण्यात पोहण्यासाठी उतरले. दरम्यान, मयूर पाटील याचा पाय घसरुन खाली पडला आणि पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. या प्रकाराची माहिती पनवेल तालुका पोलिसांना दिल्यानंतर पनवेल तालुका पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

## मोर्चा रोखला, भूमिपुत्र भडकला

### पनवेलपासूनच पोलिसांची नाकेबंदी, आंदोलनकर्त्यांवर केली कारवाई

**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व. लोकनेते तथा माजी खासदार दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे, या मागणीसाठी विधानभवनावर धडक देण्यासाठी निघालेल्या हजारो भूमिपुत्रांचा एल्गार बुधवारी (दि.८) कामोठे टोलनाक्यावर पोलिसांच्या नाकेबंदीत अडविण्यात आला. पनवेलपासूनच उभारलेल्या कडेकोट बंदोबस्तात आंदोलनकर्त्यांना मुंबईच्या दिशेने जाण्यापासून रोखण्यात आले, तर अनेकांना प्रतिबंधात्मक ताब्यात घेण्यात आले. मुसळधार पाऊस, पोलिसी अडथळे आणि कारवाईची पर्वा न करता घोषणांनी परिसर दणाणून सोडणाऱ्या आंदोलनकर्त्यांनी सरकारवर तीव्र संताप व्यक्त केला. मोर्चा थांबवता आला, पण दि. बा. पाटील यांच्या नावासाठी पेटलेला संघर्ष थांबवणे कोणालाही शक्य नाही, असा इशारा देत आंदोलन आणखी तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनाचे नेतृत्व उपोषणकर्त्या रश्मिता पोपटा यांनी केले. आंदोलनात भिवंडीचे खासदार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे, माजी आमदार बाळाराम पाटील, सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांच्यासह लोकनेते दि. बा. प्रेमी नामकरण समितीचे पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि हजारो प्रकल्पग्रस्त सहभागी झाले.

सकाळपासूनच आंदोलक पनवेलमध्ये एकत्र येऊ लागले. भर पावसात हातात फलक, बॅनर आणि लोकनेते दि. बा. पाटील यांची छायाचित्रे घेऊन एकच नाव... दि. बा. पाटील नाव, प्रकल्पग्रस्तांचा सन्मान करा, विमानतळाला दि. बा. पाटील यांचेच नाव द्या, सरकार जागे व्हा, अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

आंदोलक मुंबईकडे रवाना होण्यापूर्वीच पनवेलमधील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोलिसांनी आंदोलनातील प्रमुख नेत्यांना प्रतिबंधात्मक ताब्यात घेतले. मात्र त्यानंतरही मोठ्या संख्येने आंदोलकांनी विधानभवनाच्या दिशेने कूच करण्याचा निर्धार कायम ठेवला. यानंतर सायन-पनवेल महामार्गावरील कामोठे टोलनाका परिसरात पोलिसांनी मोठा बंदोबस्त उभारून

पान २ वर




### आंदोलन चिरडण्याचा पोलिसांचा डाव!

माजी आमदार बाळाराम पाटील यांनी पोलीस प्रशासनावर थेट निशाणा साधताना सांगितले की, यापूर्वीही रायगडमध्ये अनेक आंदोलने केली आहेत. सर्व आंदोलनांना परवानगी मिळतेच असे नाही. मात्र यावेळी पोलिसांची भूमिका दडपशाहीची असून ती निषेधार्ह आहे. आम्ही आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम आहोत. खासदार सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे यांनीही सरकारवर कठोर शब्दात टीका केली. ‘नवी मुंबई विमानतळासाठी आपल्या जमिनी दिलेल्या भूमिपुत्रांची ही लढाई आहे. या लढ्याला पोलिसी बळाने थांबवता येणार नाही. दि. बा. पाटील यांच्या नावासाठीचा संघर्ष आणखी तीव्र होईल,’ असा इशारा त्यांनी दिला.

### सत्ताधारी स्थानिक आमदारांचा धिक्कार

विशेष म्हणजे, सत्ताधारी महायुतीतील भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी या आंदोलनापासून अंतर राखले. त्यामुळे विरोधकांनी सरकारवर राजकीय हेतूने आंदोलन दडपल्याचा आरोप केला. सत्ताधारी पक्षातील आमदारांनी या आंदोलनाबाबत मौन बाळगल्याने भूमिपुत्रांनी त्यांचा जाहीर शब्दात धिक्कार केला.

### एसआयआरसाठी शाळांच्या वेळेत बदल | शिक्षण विभागाचे परिपत्रक जारी

## ३० जुलैपर्यंत सकाळच्या सत्रात भरणार शाळा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यात मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून नियुक्त शिक्षकांना पुरेसा वेळ मिळण्यासाठी आता शाळांच्या वेळेत बदल करण्यात येणार आहे. त्यानुसार ३० जुलैपर्यंत राज्यातील शाळा सकाळच्या सत्रात भरवण्याचे आदेश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. मात्र, या आदेशामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत शिक्षक संघटनांकडून प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.



प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबत परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. काही दिवसांपूर्वी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना बीएलओ शिक्षकांबाबत पत्र दिले होते. त्यात ज्या शिक्षकांना बीएलओ म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, त्यांच्या शिकवणीच्या तासिका शक्यतो कमीत कमी, सलग ठेवाव्यात, बीएलओ म्हणून नियुक्ती नसलेल्या शिक्षकांनी बीएलओ म्हणून नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या कामात सहाय्य करावे, जेणेकरून शिक्षकांवर अतिरिक्त ताण येणार नाही, असे नमूद करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर, बीएलओ असलेल्या शिक्षकांना मतदारयाद्यांचे काम करण्यास वेळ मिळण्यासाठी थेट राज्यातील शाळांचीच वेळ बदलण्यात येणार आहे.

डॉ. पालकर यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, महापालिकांचे प्रशासकीय अधिकारी, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक यांना सूचना दिल्या आहेत. त्यानुसार विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत राज्य शासकीय, स्थानिक प्राधिकारी, कंत्राटी कर्मचाऱ्यांसोबत शिक्षकांनाही मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहेत. विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयाद्या दोषविरहीत, अचूक करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण सुमारे २४ वर्षांनंतर राबवण्यात येत आहे. हे काम राष्ट्रीय कर्तव्य असून भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या कालमर्यादेत पार पाडण्यासाठी बीएलओ यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. त्यामुळे

पान २ वर

## अडकलेल्या ट्रेकर्सचा ग्रामस्थांकडून बचाव

**। नेरळ । प्रतिनिधी ।**




माथेरान डोंगरात असलेल्या गार्बेट येथे ट्रेकिंगसाठी आलेले १५ जण परतीच्या प्रवासात अडकून पडले. पावसामुळे पाण्याने भरलेला नाला पार करण्यासाठी ग्रामस्थांनी मदत केल्याने १५ जणांचे प्राण वाचले. ग्रामस्थांनी नाल्यात उतरून त्या १५ तरूण ट्रेकर्सना नाला पार करून देण्यास मदत केली.

माथेरानमध्ये प्रसिद्ध पॉईंट गार्बेट या ठिकाणी ट्रेकिंगला जाणाऱ्या पर्यटकांनी आपला जीव मुठीत घेऊन नाला ओलांडण्याचा प्रयत्न केला. कर्जत तालुक्यामध्ये गेल्या तीन ते चार दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत असून प्रशासनाकडून विविध ठिकाणी हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. असे असतानाही मुंबईहून आलेल्या काही पर्यटकांनी गारबेट ट्रेकिंगला जाण्याचा धाडसी निर्णय घेतला. रात्रीपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे एका नाल्याला पूर आला आणि सुमारे वीस ते पंचवीस पर्यटक

पान २ वर

# नागोठण्यातील मिरानगर उड्डाण पुलाला भेगा

## वाहनचालकांत घबराट



**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

मुंबई गोवा महामार्गावर खारपाडा येथे टोलनाका सुरू करून वाहनचालकांना आर्थिक भुर्दंड देणारे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण चांगला रस्ता देण्यात मात्र सपशेल अपयशी ठरले आहे. नागोठण्यातील मिरानगर येथे उभारण्यात आलेल्या महाकाय उड्डाण पुलाला महाडकडे जाणाऱ्या मार्गिकेवर निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पहिल्याच पावसात भेगा पडल्या आहेत.

त्यामुळे वाहनांचे टायर या भेगांत अडकून टायर फुटून अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. सुरक्षेच्या कारणास्तव उड्डाण पुलावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. मात्र असे असले तरी या उड्डाणपुलावर महामार्ग प्राधिकरणाने तात्पुरती डागडुजी करून मलमपट्टी न करता कायमस्वरूपी व ठोस उपाययोजना करण्याची मागणी वाहनचालकांतून होत आहे.

नागोठण्यातील मिरानगर येथे उभारण्यात आलेल्या या महाकाय उड्डाण पुलाचे काम अनेक वर्ष सुरू होते. काम सुरू असताना हा उड्डाणपूल या ना त्या कारणाने नेहमी चर्चेत राहिलेला आहे. या उड्डाण पुलाच्या कामाचा दर्जा पाहता यापूर्वीही हा पूल नागोठण्यात येण्यासाठी आलेल्या सर्व्हिस रोडवर एका बाजूला कलंडला असल्यासारखा दिसत होता. तसेच गेल्या वर्षी पावसाळ्यात या उड्डाण पुलाच्या लावलेल्या सिमेंट पॅनलमधून धबधब्या सारखे पाणी वाहत होते. त्यावेळी काही स्थानिक पत्रकारांनी आपल्या वर्तमान पत्रांतून यासंदर्भात वृत्त प्रसिद्ध करून आवाज उठविला होता. त्यानंतर महामार्ग ठेकेदाराने या उड्डाण पुलाच्या त्या बाजूचे पॅनल खोलून ते पुन्हा बसविण्यात आले होते.

खारपाडा येथील टोलनाका सुरू करायचा असल्याने या उड्डाण पुलाचे काम घाईघाईत पूर्ण केल्यानंतर महामार्ग रुंदीकरणाच्या ठेकेदाराने पुलाच्या कामात अनेक त्रुटी ठेवल्याचे या पुलावरीलाहाम ार्गाला भेगा पडल्याच्या प्रकरणावरून दिसून येत आहे. ज्याअर्थी पुलावरील रस्त्याला भेगा पडत आहेत, त्याअर्थी हा उड्डाण पूल अवजड वाहतुकीमुळे खिळखिळा होण्यास सुरुवात झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे भविष्यात या पुलाचे भविष्य काय असेल हा प्रश्नही उपस्थित होत आहे. उड्डाण पुलावरील रस्त्याला भेगा पडल्याने सद्य स्थितीत या उड्डाण पुलाची महाडकडे जाणारी मार्गिका वाहतुकीसाठी बंद करण्यात आली आहे. काल मंगळवारी (दि.७) सकाळी महामार्ग ठेकेदाराने आपली यंत्रणा वापरत या महामार्गावर भेगा पडलेल्या ठिकाणी ग्रीट व सिमेंट काँक्रीटचे मिश्रण भरण्याचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र भर पावसाळ्यात करण्यात येणारी ही डागडुजी किती दिवस तग धरणार हा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे या मार्गिकेवरून वाहने चालवताना चालकांच्या मनात धडकी भरत आहे.

नागोठणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विलास चौलकर हे नेहमीप्रमाणे मंगळवार दिनांक ७ जुलै रोजी सकाळी मॉर्निंग वॉक करण्यासाठी गेले होते. त्यावेळी विलास चौलकर उड्डाणपुलावरून जात असताना महामार्गावर महाड बाजूकडे जाणाऱ्या मार्गिकेवर रस्त्याला भल्या मोठ्या भेगा पडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ याची माहिती पत्रकारांना देऊन महामार्ग चौपदरीकरणाच्या ठेकेदाराकडून करण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाचा पर्दा फार्श केला. तसेच टोलनाका सुरू करण्याची घाई करणाऱ्या महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी आधी जनतेला चांगले रस्ते द्यावेत आणि नागोठण्यातील उड्डाणपुलाची तात्पुरती मलमपट्टी न करता कायमस्वरूपी व तंत्रशुद्ध उपाययोजना करावी अशी मागणी विलास चौलकर यांनी केली आहे.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसाने कळविण्यात येते की, मिळकतीचे मालक यांनी त्यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील खालील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी विक्री व्यवहार केलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे

-: मिळकतीचे वर्णन :-

| मौजे | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| आरावघर ता. मुरुड | ४० | क्षेत्र ०-२१-०० | ३.३१ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक /०७/२०२६

**ॲड. कौस्तुभ पुनकर**
पत्ता: जिल्हा न्यायालय
रायगड-अलिबाग
९७६५०७०००९

## पान १ वरुन

## प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्याचा बळी

उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची महिती दिली. खानावमधील ग्रामस्थांची मागणी रास्त आहे. एका कुटूंबातील कर्ता व्यक्ती गेला आहे. त्यामुळे बांधकाम विभागाने त्यांच्या कुटूंबाना भरपाई दिलीच पाहिजे, ही ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली असल्याची जाणीव करून दिली. चित्रलेखा पाटील यांच्यासह उपसरपंच निलेश गायकर, ग्रामस्थांच्या भुमिकेसोबत प्रशासनाला नमते घ्यावे लागले. अखेर सार्वजनिक बांधकाम विभागातील प्रभारी उपअभियंता दिनेश पराते यांनी पंधरा लाख रुपये देण्याचे कबूल केले. सार्वजनिक बांधकाम विभाग व महसूल विभागाच्या समन्वयाने भरपाई दिली जाईल, अशी ग्वाही दिली. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. दरम्यान, चार ते पाच तास या परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी शेकापचे माजी तालुका चिटणीस अनिल पाटील, शेकापचे कार्यकर्ते नयन पाटील, पुरोगामी युवक तालुका अध्यक्ष विक्रांत वार्डे, खानावचे सरपंच अजय नाईक, ग्रामपंचायत सदस्य सुरेश पाटील, ॲड. राकेश पाटील, प्रणित पाटील, साहिल म्हात्रे आदी मंडळी उपस्थित होते. अलिबाग–रोहा मार्गावरील खानाव गावाजवळ दोन वर्षापूर्वी पूल बांधण्यात आला होता. या पुलाला मोठा खड्डा अर्थात भगदाड पडले होते. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला. २०१९ पासून सुरु झालेला १७७ कोटी रुपयांचा अलिबाग–रोहा रस्त्याचे काम आजही अपूर्ण अवस्थेत आहे. गुजरातच्या कंपनीला या रस्त्याचा ठेका दिला आहे. मात्र सहा वर्षे उलटूनही केवळ ६० टक्के रस्ता पूर्ण झाल्याची माहिती समोर येत आहे. खानाव येथील दुर्घटनेनंतर बांधकाम विभागातील जबाबदार अधिकारी, कंपनीच्या संचालकांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केली आहे.

**अखेर त्यांचा मृत्यू झाला**

चांगू कमळू घरत हे वयोवृध्द शेतकरी असून मोलमजूरीसह गुरे सांभाळण्याचे काम करीत होते. ते नेहमी गावाजवळील गोठ्यात झोपण्यासाठी जात. मंगळवारी रात्री साधारण आठ ते साडे आठ वाजण्याच्या सुमारास ते गावातील दुकानातून गोठ्याकडे चालत जात होते. भगदाड पडलेल्या ठिकाणीच पायवाट मोकळी असल्याने त्या जागेतून ते चालत जात होते. त्याचवेळी ते भगदाडात पडले. त्यांच्या शरीराला गंभीर दुखापत झाली. त्यात पाण्याच्या प्रवाहात ते पुलाच्या जवळ असलेल्या शेतात वाहत गेले. त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाल्याचे बोलले जात आहे. सकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृतदेह शेतात दिसून आल्यानंतर या घटनेची माहिती समोर आली.

**कंपनीने जबाबदारी झटकली**

कंपनी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने मिळून पंधरा लाख रुपये द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तयार झाले. त्यांनी गेल कंपनीच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली असता, यामध्ये आमचा काहीच संबंध नाही, त्यामुळे त्यांनी भरपाईची जबाबदारी झटकल्याचे सांगण्यात आले. मात्र क्षमता नसताना पुलावरून अवजड वाहनांची वाहतूक करून पूल जीर्ण करणे ही कंपनीची जबाबदारी आहे का? असा संतप्त सवाल जनतेकडून उपस्थित करण्यात आला.

## गावठाणाचा विकास, विस्थापितांचा वनवास!

विस्थापितांच्या आरोपानुसार, पुनर्वसनाचा प्रश्न निकाली न काढताच जेएनपीए प्रशासनाने शेवा गावठाण परिसरात मंदिरांचा जीर्णोद्धार, उद्यान आणि सुशोभीकरणासाठी १३.१४ कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी दिली असून प्रत्यक्ष कामांनाही सुरुवात झाली आहे. त्यामुळे पुनर्वसनाच्या मूळ प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय, ८ डिसेंबर २०२५ रोजी शासनाला सादर करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालात बोरीपाखाडी येथील पुनर्वसनासाठी उपलब्ध जमीन अपुरी असल्याची नोंद असून, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्यविषयक अडचणी अधिक तीव्र झाल्याचे नमूद असल्याचा दावाही विस्थापितांनी केला आहे. विस्थापितांच्या आरोपानुसार, पुनर्वसनाचा प्रश्न निकाली न काढता जेएनपीए प्रशासनाने शेवा मूळ गावठाण परिसरात मंदिरांचा जीर्णोद्धार, उद्यान व सुशोभीकरणासाठी सुमारे १३.१४ कोटींच्या कामांना मंजुरी दिली आहे. संबंधित ठेकेदारांकडून प्रत्यक्ष कामेही सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## मोर्चा रोखला, भूमिपुत्र भडकला

आंदोलन रोखले. आंदोलकांनी पुढे जाण्याचा प्रयत्न करताच पोलिसांनी त्यांना अडविले. काही काळ पोलीस आणि आंदोलकांमध्ये शाब्दिक चकमक झाली. त्यानंतर पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई करत अनेक आंदोलकांना ताब्यात घेतले. महिला आंदोलकांसाठी स्वतंत्र महिला पोलीस पथके तैनात करण्यात आली होती. अनेक आंदोलकांना पोलीस वाहनांमध्ये बसवून विविध पोलीस ठाण्यांकडे हलविण्यात आले. भर मुसळधार पावसातही आंदोलकांनी घोषणाबाजी सुरू ठेवत आपल्या मागणीवर ठाम असल्याचे दाखवून दिले.

**परवानगी का नाकारली?**

विशेष म्हणजे, आंदोलनकर्त्यांनी पोलिस प्रशासनाकडे नियमानुसार मोर्चासाठी परवानगी मागितली होती. सुरुवातीला मोर्चा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातून काढण्याचा प्रस्ताव होता. पोलिसांच्या सूचनेनुसार आयोजकांनी मार्गात बदल करून पनवेलच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मोर्चा काढण्याचे मान्य केले. तरीदेखील अंतिम क्षणी परवानगी नाकारण्यात आली. त्यामुळे आंदोलनकर्त्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली. परवानगी द्यायची नव्हती तर मार्ग बदलण्यास का सांगितले? सरकारला नेमकी भीती कशाची आहे? असा संतप्त सवाल आंदोलकांनी उपस्थित केला.

## अडकलेल्या ट्रेकर्सचा ग्रामस्थांकडून बचाव

नाल्याच्या पलीकडे अडकून पडले. यावेळी सागाची वाडी येथील आदिवासी ग्रामस्थांनी ज्या ठिकाणी आहात तिथेच थांबा, असे सांगितले. मात्र,या सूचनांकडे दुर्लक्ष करून काही पर्यटकांनी नाल्यात उतरून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. नाल्याच्या अर्ध्या भागापर्यंत पोहोचताच पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने पर्यटक अडचणीत सापडले. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच स्थानिक ग्रामस्थांनी तात्काळ धाव घेत धाडसाने रेस्क्यू ऑपरेशन राबवले. ग्रामस्थांच्या मदतीने सर्व पर्यटकांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. या घटनेमुळे मोठा अनर्थ टळला असून ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे पर्यटकांचा जीव वाचला आहे.

## ३० जुलैपर्यंत सकाळच्या सत्रात भरणार शाळा

शिक्षकांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून कामकाज पार पाडण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ मिळावा, काम दिलेल्या कालावधीत पूर्ण व्हावे, कामाचा ताणही येवू नये, यासाठी सर्व शाळा प्रशासनांना आपल्या स्तरावरुन सूचना द्याव्यात. बीएलओ शिक्षकांच्या अध्यापनाचे नियोजन करताना त्यांच्या शिकवणीच्या तासिका शक्यतो कमीत कमी ठेवाव्यात, व त्या प्राधान्याने सलग ठेवून शक्यतो शाळा सकाळच्या सत्रामध्ये भरवण्याचे नियोजन ३० जुलैपर्यंत करावे, संबंधित शिक्षकांना त्यांचे शैक्षणिक कार्य सलग पूर्ण करुन उर्वरित वेळेत बीएलओ म्हणून असलेली जबाबदारी कार्यक्षमतेने पार पाडता येईल, बीएलओ नसलेल्या शिक्षकांनी आवश्यकतेनुसार बीएलओ असलेल्या शिक्षकांना शैक्षणिक, संबंधित कामकाजामध्ये सहकार्य करावे, तसेच बीएलओ शिक्षकांवर काम पडणार नाही अशा प्रकारे शाळा प्रमुखांनी अंतर्गत कामाचे नियोजन करावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## बेलवड्यात डोंगर सरकले, घरांना भेगा

ग्रामपंचायतीचे सरपंच हरेश पाटील आणि भाजप युवा मोर्चाचे पदाधिकारी प्रवीण पाटील यांनी पुढाकार घेत नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले. बाधित कुटुंबांसाठी अन्न व पिण्याच्या पाण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, प्रशासनाचा एकही अधिकारी घटनास्थळी न आल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. आदिवासीवाडीतील नागरिक गेल्या तीन दिवसांपासून जीव मुठीत धरून रात्र जागवत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. प्रवीण पाटील यांनी सांगितले की, २८ घरांतील सुमारे ८० ते ८५ नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविले आहे. मात्र, अद्याप कोणताही अधिकारी पाहणीसाठी आलेला नाही. बाधितांच्या निवास, अन्न व इतर मूलभूत सुविधांची व्यवस्था प्रशासनाने तातडीने करणे आवश्यक आहे. दरम्यान, संतप्त ग्रामस्थांनी प्रशासनाला थेट सवाल करत, दरड आमच्या अंगावर कोसळल्यावरच अधिकारी येणार का? असा संतप्त प्रश्न उपस्थित केला. बाधितांना तात्काळ मदत, पंचनामा, सुरक्षित निवारा आणि कायमस्वरूपी संरक्षणाची उपाययोजना करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली आहे. याबाबत तहसीलदार तानाजी शेजाळ यांच्याशी संपर्क साधला असता, तातडीने तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाठवितो असे त्यांनी सांगितले.

### मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड
### निविदा सुचना
### सन २०२६-२७

मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे खालील काम करणेसाठी इच्छुक व अनुभवी असलेल्या ठेकेदार यांचेकडे द्वि लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागवित आहोत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची इसारा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १ | मुरुड जंजिरा नगर परिषद हद्दीतील उद्यान देखभाल व व्यवस्थापन कामासाठी निविदा प्रक्रिया राबविणे. | ३,०००/- | २००/- |

उपरोक्त निविदाबाबतची फॉर्मची विक्री, स्विकृती व निविदा उघडण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे राहील.
१. कोणतीही निविदा अगर सर्वच निविदा त्याबाबत कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.
२. सदर कामाची निविदा द्वि-लिफाफा पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.
३. लिफाफा क्र. १ मध्ये भरावयाची कागदपत्रे ही निविदा फॉर्म मध्ये नमुद करण्यांत आलेली आहेत. त्यानुसार कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
४. लिफाफा क्र. २ मध्ये निविदापत्रक दर भरुन सादर करावयाचे आहे.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिद्धी | ०९/०७/२०२६ | सकाळी ११.०० वाजता | | |
| निविदा भरण्याचा कालावधी | ०९/०७/२०२६ | सकाळी ११.०० वाजता | १६/०७/२०२६ | सायं. ५.०० वाजता |
| निविदा उघडण्याचा कालावधी | १७/०७/२०२६ सायं. ५.०० वाजता किंवा प्रशासकीय सोईनुसार | | | |

म्यु.जा.क्र. ७२४/बांध/२०२६-२७
मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालय
मुरुड जंजिरा, जि. रायगड
दिनांक ८/७/२०२६

सही/-
**(सचिन बच्छाव)**
मुख्याधिकारी
मुरूड जंजिरा नगरपरिषद

### E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S.(O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | **e-Tender-12/26-27/ Rfx No. 7000040019** | AMC of the maintenance of (SCHRACK SECONET Make) fire detection and the Alarm system at 400 kV Nagothane substation under 400 kV RS O&M Div. Nagothane... **3rd call** | **Limited to Rs. 4,00,000/-** | **19.07.2026 up to 23.59 hrs.** |

**EMD** Rs. 5000/-, **Tender fee** Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) **Mob No.** 9461456635 **Email ID:** ee7230@mahatransco.in **Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

### अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
### जाहीर नोटीस

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणा संबंधाने अलिबाग नगरपरिषद प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह अलिबाग नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अलिबाग नगरपरिषद/जाहीर नोटीस जा.क्र. /२०२६ दि.

| अ. क्र. | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप वर्णन/ब्लॉक/ गाळा वगैरे | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्यांची नावे | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १३६८/०५०८१ | ब्राह्मण आळी रामनाथ रोड अलिबाग | चौथा मजला, निवासी सदनिका क्र. ४०३ | दीपम बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे भागीदार मोहनिश दिलीप जोग व दिपा दिलीप जोग | प्रसाद शरद जांभेकर व योगिता प्रसाद जांभेकर |
| २ | २ | १५९५/०५१५१ | ब्राह्मण आळी रामनाथ रोड अलिबाग | पाचवा मजला, निवासी सदनिका क्र. ५०४ | मे ए कॉर्प तर्फे पार्टनर हार्दिक पिनाकिन अजमेरा | स्नेहा शेखर पाटील व बिश्रा शेखर पाटील |
| ३ | २ | १५९५/०५१५१ | ब्राह्मण आळी रामनाथ रोड अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र. ३०३ | मे ए कॉर्प तर्फे पार्टनर हार्दिक पिनाकिन अजमेरा | निलेशकुमार नटवरलाल गांधी |
| ४ | २ | १२७०/०५०६९ | मारूती नाका अलिबाग | तळमजला, निवासी गाळा क्र. ६ | राजेंद्र प्रेमजी जैन व ताराचंद प्रेमजी शहा | मुकेश कांतीलाल जैन |
| ५ | २ | १६४८/ए विंग/०१९६९ | कन्याशाळेजवळ ब्राह्मण आळी अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र. १०३ | निलांबरी सुरेश सहस्त्रबुद्धे व सुरेश गोविंद सहस्त्रबुद्धे | मच्छिंद्र सुरेश म्हात्रे |
| ६ | २ | ३३/३९/०४१८८ | जुन्या मार्केटजवळ अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र. ३११ | रियाज नजीर फकी व सुलताना रियाज फकी | शकीरउल्लाह सफातुल्लाह चौधरी व जैनब खातून चौधरी |
| ७ | २ | ४६५ बी विंग/००५८१ | ठिकरूळ नाक्याजवळ अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. बी १०३ | मे.श्री. गणेश बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सचे भागीदार वालजी हीरजी पटेल, अमरजी वालजी पटेल, किशोर वालजी पटेल विजय वालजी पटेल व भवन वालजी पटेल | सुरेंद्र वामन ढवळे |
| ८ | २ | १२३७ ए विंग/०१५०५ | मारूती नाका अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र. १०१ | उमेश सखाराम पवार व श्रद्धा उमेश पवार | जय सतीश घरत व समिधा सतीश घरत |
| ९ | २ | ११०४/ई विंग/०३६०४ | मारूती नाका अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. ३०४ | विद्या अरविंदकुमार नायर | अंकित श्रीनिवास बंगेरा |
| १० | २ | ११०४/ई विंग/०३६०४ | मारूती नाका अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. ३०३ | शार्दुल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार सौ. निलम किशोर हजारे व प्रशांत दिनकरराव फुलगावकर | ललिता श्रीनिवास बंगेरा व अंकित श्रीनिवास बंगेरा |
| ११ | २ | १५७२/०१८७१ | एस.टी. स्टँड राममंदिर रोड, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०१ | स्मिता दिलीप परळीकर | शिल्पा शशिकांत वर्तक |
| १२ | २ | १५९५/०१८७१ | ब्राह्मण आळी, रामनाथ रोड, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. २०४ | मे ए कॉर्प तर्फे पार्टनर हार्दिक पिनाकिन अजमेरा | जगदीश कृष्णा पाटील |
| १३ | २ | १५९५/०५१५१ | ब्राह्मण आळी अलिबाग | पाचवा मजला, निवासी सदनिका क्र. ५०५ | मे ए कॉर्प तर्फे पार्टनर ऋषभ मयुर अजमेरा | नितेश यशवंत महाले |
| १४ | २ | १३४५ ए विंग/०१६१० | ब्राह्मण आळी अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. २०१ | मे शिवशक्ती एंटरप्रायझेस तर्फे पार्टनर सतीश रमेशलाल तुनिया सुखवानी विजय अंब्रतलाल व घनःश्याम रतनचंद पुरस्वानी | विराज नारायण कीर |
| १५ | २ | १३३६ सी विंग/०१६०२ | ब्राह्मण आळी अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. २०४ | संतोष पंढरीनाथ जोशी | ज्योती उमेश पाटील व पारस उमेश पाटील |
| १६ | ३ | ८३५ डी विंग/०११२७ | जुन्या पोस्टाची गल्ली, अलिबाग | तळमजला, वाणिज्य गाळा क्र. ०४ | कुशाल वासुदेव उंदिरे | निखिल वासुदेव उंदिरे |
| १७ | २ | १९२२/अ/०५२०३ | रामनाथ रोड अलिबाग | पहिला मजला, सदनिका क्र. १०३ | दर्शन जगदीश शाह | कुशल हेमंत राऊळ व तेजस्विनी कुशल राऊळ |
| १८ | २ | ४७४/ड/००५९६ | श्रीबाग ३ अलिबाग | तळमजला, व्यापारी गाळा क्र. २ | आशा अनंत डाकी | शमिका ललित पाटील व ललित नागेश पाटील |
| १९ | २ | १५७३/०१८७२ | एस.टी. स्टँडसमोर रोड, अलिबाग | दुसरा मजला, सदनिका क्र. २०२ | रमेश नारायण माईणकर व छाया सुभाष जोशी | सेजल सचिन म्हात्रे |
| २० | २ | १३५८/०१६२५ | ब्राह्मण आळी अलिबाग | तळमजला, वाणिज्य गाळा क्र. ०३ | समता रूपेश काळण | किर्ती मुरजी शहा |
| २१ | २ | १५९५/०५१५१ | ब्राह्मण आळी अलिबाग | दुसरा मजला, सदनिका क्र. २०१ | मे कॉर्प तर्फे पार्टनर ऋषभ मयुर अजमेरा | राधिका राजेश थळे |
| २२ | २ | ३२/०४०९५ | जुने भाजीमार्केट अलिबाग | तिसरा मजला, सदनिका क्र. ३०२ | शिल्पा निलेश नाईक वगैरे ३ | प्रगती सुबोध थळे |
| २३ | २ | ५३९/००७१५ | चेंढरे, अलिबाग | तिसरा मजला, सदनिका क्र. ३०२ | राजेंद्र मधुकर सुंकले व रश्मी राजेंद्र सुंकले | अजित तुकाराम सिंगासने अवंतिका अजित सिंगासने |
| २४ | २ | ८९५/०११८६ | शिवलकर नाका | सदनिका २ | परशुराम पांडुरंग गडदे | सुरेखा विश्वनाथ गडदे |

**सही/-**
**मुख्याधिकारी करिता**
**अलिबाग नगरपरिषद**

# इथेनॉलवरून भडका

आपण धोरण आखायचे आणि जनतेने ते मान खाली घालून स्वीकारायचे याची सरकारला सवय झाली आहे. मोदीने किया है तो कुछ सोच समझके ही किया होगा असा एक वाक्प्रचार जनतेत मुद्दाम रूढ करण्यात आला आहे. मोदी सरकार कधीही चुकू शकत नाही. ते जनतेच्या भल्याचाच निर्णय घेते असा राक्षसी प्रचार त्यातून आकाराला आला. त्यातूनच मोदींच्या मागे अंधभक्तांची फळी उभी राहिली. पण शेवटी व्यवहार कोणालाही चुकलेला नाही. सरकार सांगते आहे एक आणि त्याचा अनुभव मात्र भलताच येतो आहे असे म्हटल्यानंतर अंधभक्तांमध्येही चुळबूळ सुरू होते. अशी चुळबूळ आधी नीट परिक्षेचा पेपर फुटण्यावरून झाली. या सरकारला साधी परिक्षा नीट घेता येत नाही इथपासून तो पेपर फोडण्यामध्ये सरकारच्याच काही लोकांचा स्वार्थ गुंतलेला आहे अशापर्यंत अनेक मते व्यक्त झाली. त्यातून मध्यमवर्गातील लोकांमध्ये प्रचंड संताप उसळला. कॉक्रोच जनता पार्टीला मिळालेल्या प्रतिसादावरून तो दिसून आला. आता नीटची फेरपरीक्षा पार पडलेली असल्याने सध्या हा विषय मागे पडला असला तरी सरकारच्या विश्वासार्हतेला जबर तडे गेले यात शंका नाही. आता तो विषय मागे पडतो तोच इथेनॉलचा विषय पुढे आला आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचे प्रमाण वाढवण्याच्या मुद्द्यावरून सध्या दुचाकी व चारचाकी गाड्या बाळगळणारी मंडळी खवळलेली आहेत. दिल्लीमध्ये पाच जुलैला चारचाकी गाडीवाल्यांनी जंतरमंतरवर निदर्शने केली. मिडियामधून ती दाखवावी लागली. त्यामुळे देशभर हा विषय पेटला. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचे प्रमाण सध्याच्या वीस टक्क्यांहून अधिक करण्याला सरकार परवानगी देणार आहे अशा केवळ बातम्यांच्या आधारे हे वातावरण तापले हे विशेष म्हणायला हवे. या प्रस्तावित बदलांना विरोध करणाऱ्यांमध्ये बहुतांश सगळे भाजपचे उच्चवर्गीय व उच्चवर्णीय मतदार आहेत. त्यामुळे भाजपचे धाबे दणाणले असेल. आजवर याच वर्गाच्या पाठिंब्याच्या जोरावर भाजपने दादागिरी केली. उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये रामाचे नाव घेतले की लोक पागल होतात. पण मुंबई–दिल्लीची जनता आणि गुजरातेतील बनिया मंडळी यांना धंद्यात फायद्याचे कलम दिसावे लागते. ते दिसले नाही की ती बिथरतात. सध्या तसेच झाले आहे.

### इंजिनाची खराबी

मुळात वाजपेयी सरकारच्या काळात पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याला परवानगी देण्यात आली. आरंभी हे प्रमाण दहा टक्के ठेवण्यात आले. भारत वर्षाला सुमारे बावीस लाख कोटी रुपयांचे पेट्रोल इत्यादी इंधन आयात करतो. त्यामुळे त्या खर्चात बचत होणे स्वागतार्ह होते. दुसऱ्या बाजूने शेतीमाल वापरून इथेनॉल तयार होणार असेल व त्यातून शेतकऱ्यांना पैसे मिळणार असतील तर ते चांगले आहे अशी सर्वांची भावना होती. त्यातूनच सर्व पक्षांनी हे धोरण उचलून धरले. मोदी सरकारने इथेनॉलचे हे प्रमाण वीस टक्क्यांवर नेण्याचे ठरवले. त्यासाठी २०३० ची मुदत ठरवली. त्या वेळपर्यंत सरसकट सर्वत्र पेट्रोलमध्ये वीस टक्के इथेनॉल मिसळून गाड्यांमध्ये वापरले जाईल असे ठरले. या सगळ्याचा संबंध जागतिक तापमानवाढीशी जोडण्यात आला. पेट्रोल इत्यादी इंधनाच्या उत्खननामुळे व वापरामुळे ही वाढ अधिक होते असा दावा करून इथेनॉलमुळे यात कपात होईल असे गाजर दाखवण्यात आले. त्याबाबत अनुकूलतेचा फायदा घेऊन मोदी सरकारने २०२५ पर्यंत, म्हणजे निहित मुदतीच्या आधीच पाच वर्षे ८० टक्के पेट्रोल आणि वीस टक्के इथेनॉल असे मिश्रण करून विकायला सुरुवात केली. आता बाजारात मिळणारे सगळे पेट्रोल असेच मिळते. पेट्रोलचे प्रमाण बदलले. पण त्यानुसार गाड्यांची इंजिन्स काही बदलली नाहीत. सध्या बहुतांश दुचाकी व चारचाकी गाड्यांमध्ये दहा टक्के इथेनॉल जाळू शकतील अशा प्रकारची इंजिन्स अस्तित्वात आहेत. पण सरकारच्या धोरणामुळे त्यांना पेट्रोल मात्र वीस टक्के इथेनॉल मिसळलेले विकले जात आहे. या वाढीव इथेनॉलमुळे आपल्या गाड्यांचे मायलेज कमी होत असल्याच्या तसेच इंजिनाची खराबी होत असल्याच्या तक्रारी वाढल्या. आरंभी त्याकडे चार लोकांची कुजबूज म्हणून दडपण्याचा प्रयत्न झाला. पण आता याबाबत गाड्यांच्या अनेक जाणकारांनी मते मांडली आहेत. सगळ्यात महत्वाचे म्हणजे वाढीव इथेनॉलमुळे इंजिन व पेट्रोल टाकीशी संबंधित रबराचे पार्ट्स सतत खराब होत असल्याचे अहवाल समोर आले.

### भक्तांमधील चुळबूळ

या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली असून गाड्यांच्या वापरातले नामवंत लोक याबाबत न्यायालयासमोर पुरावे देऊ असे म्हणत आहेत. वीस टक्के इथेनॉलमुळे गाड्यांचे मोठे नुकसान होते व पेट्रोल जास्त लागते असा मतप्रवाह बळकट होऊ लागला आहे. हे होत असताना त्याकडे दुर्लक्ष करून सरकारने वीस टक्क्यांहून अधिक इथेनॉल असेल अशा पेट्रोलवरचा अबकारी कर कमी करण्याचे धोरण आणले. त्यामुळे आता लवकरच तीस टक्के इथेनॉल आणि ७० टक्के पेट्रोल अशा मिश्रणाची सक्ती होणार अशी भीती वाहनचालकांना वाटू लागली. त्यातूनच मग मिडियामध्ये असंतोष व्यक्त होऊ लागला व शेवटी लोक निदर्शनांसाठी रस्त्यावरही उतरले. मोदी सरकारने नेहमीप्रमाणे यावर मौन बाळगले आहे. सरकार नवीन धोरण आणणार की नाही हे काहीच सांगत नाही. दुसरीकडे नितीन गडकरी मात्र इथेनॉल अधिकाधिक मिसळणे कशे चांगले आहे याबद्दल रोज विधाने करीत आहेत. अगदी कालच म्हणजे मंगळवारी त्यांनी इथेनॉलची निर्मित वाढली तर उत्तर प्रदेश व बिहारच्या मक्याच्या शेतकऱ्यांना ४५ हजार कोटी रुपये वाढीव उत्पन्न मिळेल असे खास गडकरी शैलीतले गाजर दाखवले. गडकरींच्या मानाने हा आकडा तसा कमीच म्हणायला हवा. कारण एरवी गडकरी किमान लाख कोटींच्या खाली काही बोलत नाहीत. असो. पण यात अनेक गंभीर मुद्दे गुंतलेले आहेत. एक म्हणजे वाढीव इथेनॉलच्या निर्मितीसाठी ऊस, मका, तांदुळ अशी पिके वापरावी लागतील. त्यासाठी बरेच एकतर प्रचंड पाणी लागेल. दुसरे म्हणजे निव्वळ पैसे मिळतात म्हणून शेतकरी केवळ याच पिकांकडे वळले तरी बाकीचे धान्य, कडधान्य आणि तेलबिया यांचे उत्पादन कमी होत जाईल. हे आपल्याला परवडणारे नाही. दुसरे म्हणजे वीस टक्क्यांहून अधिक इथेनॉल मिसळण्याचे धोरण अधिकृतपणे जाहीर न करताच सरकारने अबकारी करात सूट दिल्याने यात काळेबेरे असल्याचा संशय वाढला आहे. वीस टक्क्यांहून अधिक इथेनॉलसाठी तशा प्रकारची सक्षम इंजिन्स लागतील. ती न करताच सध्याच्या गाड्यांमध्ये ते वापरू गेले तर इंजिनांची खराबी होईल. मोटार कंपन्या याबाबत मूग गिळून गप्प आहेत. त्या सरकारला विरोध करू इच्छित नाहीत. इंजिनमध्ये बदल करायचे म्हणजे खर्च येणार व गाड्यांच्या किमतीही वाढणार आहेत. त्याचा वेगळा फटका बसेल. सरकार धोरण जाहीर न करता परस्पर ३० टक्के इथेनॉलवाल्या पेट्रोलला सरसकट परवानगी देईल की काय अशी अनेकांना भीती वाटते. सध्या आपल्याला जे पेट्रोल मिळते त्यात किती इथेनॉल आहे याचे प्रमाण पंपावर कुठेही दर्शवलेले नसते. त्यामुळे उद्या ते वाढले तरी आपल्याला काहीच कळणार नाही. हा सगळा गुप्त, गुपचूप, भानगडीचा मामला आहे या शंकेनेच भक्तांमधील चुळबूळ वाढली आहे. बरे आहे. त्या निमित्ताने का होईना सरकारच्या खऱ्या स्वरुपाची यांना जाणीव होईल.

---

**विचार**

# पाकिस्तानच्या राजकीय स्थैर्यालाच आव्हान

***पाकव्याप्त काश्मीरमधील सध्याचे आंदोलन एक गंभीर राजकीय आणि सामाजिक आव्हान बनले आहे. आर्थिक संकट, वाढती महागाई, प्रशासनावरील अविश्वास या घटकांनी हा असंतोष अधिक तीव्र केला आहे. संवाद, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकशाही मूल्यांचा सन्मान यांच्याच आधारे अशा संघर्षांचे शाश्वत समाधान शक्य आहे. अन्यथा, हे पाकिस्तानच्या राजकीय स्थैर्यासमोरील मोठे आव्हान ठरू शकते.***



**प्रा. जयसिंग यादव**

पाकव्याप्त काश्मीर पुन्हा एकदा आंदोलनाच्या ज्वाळांनी पेटले आहे. गेल्या काही दिवसांपासून रावळकोटसह अनेक भागांमध्ये हजारो नागरिक रस्त्यावर उतरले असून महागाई, बेरोजगारी, आर्थिक संकट, प्रशासनाची उदासीनता आणि राजकीय अधिकारांच्या मागणीसाठी आवाज उठवत आहेत. या आंदोलनामुळे पाकिस्तानमधील अंतर्गत राजकारण ढवळून निघाले असून आंतरराष्ट्रीय स्तरावरही या प्रदेशातील परिस्थितीकडे नव्याने लक्ष वेधले जात आहे. विशेष म्हणजे हा केवळ आर्थिक प्रश्न राहिलेला नाही, तर लोकशाही, प्रशासन, नागरी हक्क आणि राजकीय स्वायत्तता या मूलभूत मुद्द्यांवर केंद्रित झालेला व्यापक जनआक्रोश बनत चालला आहे. पाकिस्तान अनेक दशकांपासून काश्मीर प्रश्नावर आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतावर टीका करत आला आहे; मात्र पाकव्याप्त काश्मीरमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाने पाकिस्तानलाच अस्वस्थ करणारे अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. एका बाजूला काश्मिरी जनतेच्या अधिकारांचा पुरस्कार करण्याचा दावा केला जात असताना, दुसऱ्या बाजूला स्वतःच्या प्रशासनाखालील प्रदेशातील नागरिक रस्त्यावर उतरून मूलभूत सुविधा, आर्थिक न्याय आणि राजकीय प्रतिनिधित्वाची मागणी करत आहेत, ही परिस्थिती पाकिस्तानच्या अधिकृत भूमिकेतील विरोधाभास अधोरेखित करते. आंदोलनाचे नेतृत्व ‘अवामी ॲक्शन कमिटी’कडे असल्याचे सांगितले जाते. या संघटनेच्या माध्यमातून हजारो नागरिकांनी रावळकोट येथे मोठी सभा घेतली. आयोजकांनी या सभेत मोठ्या संख्येने लोक सहभागी झाल्याचा दावा केला आहे. या संख्येची स्वतंत्र पुष्टी उपलब्ध नसली, तरी आंदोलनाचा विस्तार आणि त्यामागील असंतोष दुर्लक्षित करता येणार नाही.

या आंदोलनामध्ये लोकांचा सहभाग वाढत असल्याचे विविध वृत्तांमधून दिसून येत आहे. या आंदोलनाची मुळे केवळ राजकीय नाहीत, तर आर्थिक वास्तवाशी घट्ट जोडलेली आहेत. पाकिस्तान गेल्या काही वर्षांपासून गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत आहे. महागाई, परकीय चलनाचा तुटवडा, वाढते कर्ज, ऊर्जासंकट आणि बेरोजगारी यांचा परिणाम या देशातील सर्वच भागांवर झाला आहे. पाकव्याप्त काश्मीर त्याला अपवाद नाही. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढलेल्या किमती, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि विकासकामांचा अभाव यामुळे सामान्य नागरिकांचे जीवन अधिक कठीण झाले आहे. त्यामुळे आर्थिक असंतोषाने आता राजकीय स्वरूप धारण केले आहे. आंदोलनकर्त्यांचा आरोप आहे, की त्यांच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले. काश्मीरच्या भवितव्याशी संबंधित निर्णय स्थानिक नागरिकांच्या इच्छेविना घेतले जातात, अशी त्यांची भावना आहे. त्यामुळे अधिक राजकीय स्वायत्तता, लोकशाही प्रक्रिया बळकट करणे आणि स्थानिक जनतेच्या सहभागातून निर्णय घेण्याची मागणी अधिक तीव्र झाली आहे. ही मागणी केवळ प्रशासनाविरोधातील प्रतिक्रिया नसून लोकशाही मूल्यांवरील विश्वासाची अभिव्यक्तीही आहे. या आंदोलनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महिलांचा आणि ‘सोशल मीडिया’चा वाढता सहभाग. पारंपरिक आंदोलनांच्या तुलनेत आजच्या डिजिटल युगात माहितीचा प्रसार अतिशय वेगाने होतो. त्यामुळे स्थानिक ‘सोशल मीडिया’ प्लॅटफॉर्मवरून नागरिक आपले अनुभव, अडचणी आणि आंदोलनाशी संबंधित माहिती सातत्याने मांडत आहेत.

महिलांनीही या आंदोलनात सक्रिय भूमिका घेतल्यामुळे या संघर्षाला सामाजिक स्वरूप प्राप्त झाले आहे. समाजातील विविध घटकांचा सहभाग वाढतो, तेव्हा संबंधित आंदोलनाची व्याप्ती आणि परिणामकारकता अधिक वाढते. दुसरीकडे, आंदोलनकर्त्यांनी प्रशासनावर आवश्यक वस्तूंच्या पुरवठ्यामध्ये अडथळे निर्माण केल्याचा आरोप केला आहे. काही ठिकाणी जीवनावश्यक वस्तूंनी भरलेले ट्रक सीमावर्ती भागात अडवून ठेवण्यात आल्याचे दावे ‘सोशल मीडिया’वर करण्यात आले आहेत. या दाव्यांची स्वतंत्र पुष्टी झाली नसली, तरी अशा बातम्यांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे. कोणत्याही प्रदेशात अन्नधान्य, औषधे आणि अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा खंडित होण्याची शक्यता निर्माण झाल्यास त्याचे दूरगामी सामाजिक परिणाम होऊ शकतात. या प्रकरणी सरकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई झाल्याचे आणि काही निवृत्त सैनिकांवर आंदोलनापासून दूर राहण्यासाठी दबाव टाकल्याचेही आरोप करण्यात आले आहेत. या आरोपांची अधिकृत पुष्टी होत नसली तरी, अशा बातम्या लोकशाही व्यवस्थेतील अभिव्यक्तीस्वातंत्र्याबाबत प्रश्न उपस्थित करतात. लोकशाहीमध्ये नागरिकांना शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार असतो. प्रशासनाने कायदा आणि सुव्यवस्था राखणे आवश्यक असले, तरी त्याचबरोबर नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणेही तेवढेच महत्त्वाचे असते. पाकिस्तान सरकारचा दावा मात्र वेगळा आहे.

पाकिस्तानी प्रशासनाचे म्हणणे आहे, की कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्धच कारवाई केली जात आहे आणि शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जात आहेत. कोणत्याही आंदोलनात प्रशासन आणि आंदोलनकर्ते यांच्यातील दाव्यांमध्ये मोठी तफावत असते. त्यामुळे स्वतंत्र चौकशी आणि विश्वासार्ह माहितीच्या आधारेच वस्तुस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होऊ शकते. या आंदोलनाचे राजकीय पडसादही उमटू लागले आहेत. पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी संसदेत आंदोलकांवर टीका केली. त्यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वाद निर्माण झाला आणि आंदोलनकर्त्यांनी त्याला विरोध दर्शवला. यावरून स्पष्ट होते, की पाकव्याप्त काश्मीरमधील असंतोष हा आता केवळ स्थानिक प्रश्न राहिलेला नाही, तर पाकिस्तानच्या राष्ट्रीय राजकारणातला महत्त्वाचा विषय बनला आहे. या आंदोलनामुळे १९४८ नंतरच्या पाकव्याप्त काश्मीरच्या राजकीय प्रवासावरही पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. या प्रदेशातील लोकांना कितपत राजकीय स्वायत्तता आहे, स्थानिक प्रशासन किती प्रभावी आहे आणि लोकप्रतिनिधींना निर्णयप्रक्रियेत किती अधिकार आहेत, या प्रश्नांवर नव्याने विचार केला जात आहे. अनेक दशकांपासून हे प्रश्न कायम आहेत. त्यामुळे आजचे आंदोलन ही अचानक उद्भवलेली घटना नसून, दीर्घकाळ साचलेल्या असंतोषाचा उद्रेक असल्याचे अनेक अभ्यासक मानतात. यातून पाकिस्तानसमोर दोन महत्त्वाची आव्हाने उभी राहिली आहेत. एक म्हणजे आर्थिक संकटावर प्रभावी उपाय योजणे आणि दुसरे म्हणजे नागरिकांचा विश्वास पुन्हा जिंकणे.

केवळ आंदोलन दडपून किंवा सुरक्षा उपाय वाढवून प्रश्न सुटत नाहीत. त्यासाठी संवाद, पारदर्शक प्रशासन आणि लोकांच्या अपेक्षांना न्याय देणाऱ्या धोरणांची गरज असते. भारताच्या दृष्टीनेही हा घटनाक्रम महत्त्वाचा आहे. भारत सातत्याने संपूर्ण जम्मू–काश्मीर हा आपला अविभाज्य भाग असल्याची भूमिका मांडत आला आहे. या पार्श्वभूमीवर पाकव्याप्त काश्मीरमधील घडामोडींकडे भारत बारकाईने लक्ष ठेवून आहे; मात्र या विषयाकडे पाहताना संवेदनशीलता आणि वस्तुनिष्ठता आवश्यक आहे. कारण काश्मीरसारख्या गुंतागुंतीच्या प्रश्नात भावनिक प्रतिक्रिया किंवा राजकीय आरोप–प्रत्यारोपांपेक्षा शांतता, स्थैर्य आणि लोककल्याण अधिक महत्त्वाचे असते. लोकशाही व्यवस्थेची खरी कसोटी संकटाच्या काळात लागते. नागरिकांचा आवाज ऐकून घेणे, त्यांच्या समस्यांवर संवादाद्वारे तोडगा काढणे आणि प्रशासनावर विश्वास निर्माण करणे ही कोणत्याही सरकारची जबाबदारी असते. लोकांना आपल्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरावे लागते, तेव्हा ती केवळ आंदोलनकर्त्यांची नाही, तर संपूर्ण प्रशासन व्यवस्थेचीही परीक्षा असते. आज पाकव्याप्त काश्मीरमध्ये सुरू असलेले आंदोलन हा केवळ एका प्रदेशाचा प्रश्न नाही. तो शासनव्यवस्था, आर्थिक न्याय, लोकशाही आणि नागरी अधिकार यांच्यातील संतुलनाचा प्रश्न आहे. इतिहास सांगतो, की लोकांच्या आकांक्षा आणि असंतोषाकडे दीर्घकाळ दुर्लक्ष केल्यास अधिक गंभीर परिणाम होतात. त्यामुळे या परिस्थितीत सर्व संबंधित पक्षांनी संयम, संवाद आणि लोकशाही मार्गाचा स्वीकार करणे हीच काळाची गरज आहे.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

---

**चर्चा आजची**

# राज्यातील ‘मिसिंग’ विकास

**संतोष राऊळ**

काही दिवसांपूर्वी राज्यात सत्ताधाऱ्यांकडून मोठंमोठ्या विकासाच्या गप्पा मारल्या जात होत्या. विकास झाला खरा, पण तो टक्केवारी खाणाऱ्यांचा, संबंधित अधिकाऱ्याचा आणि काही प्रमाणात ठेकेदाराचा. कारण नवं नविन रस्ते बांधले म्हणजे विकास झाला, अशी सत्ताधिकाऱ्यांकडून सर्वांची समज करण्यात आली आहे. आणि हाच विकास असेल तर दरवर्षी प्रमाणे यंदाही पावसाने त्यांच्या विकासाची पोलखोल केली आहे. आणि सध्या तोच विकास ‘मिसिंग’ झाल्याचे सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे.

राज्यात सध्या मोठ्याप्रमाणात नव्याने रस्ते बांधण्यात येत आहेत. त्यातील काही मार्ग नव्याने तर काही नवे मार्ग जुन्या रस्त्यांना जोडून बनविले जात आहेत. त्यातच नुकताच मुंबई–पुणेला जोडणारा ‘मिसिंग लींक’ बनविण्यात आला. मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आणि प्रवासाचा कालावधी आणखी कमी करण्यासाठी खोपोली ते कुसगाव असा १३.३ किमी लांबीचा मिसिंग लिंक एमएसआरडीसीकडून बांधण्यात आला आहे. त्यासाठी ७ हजार १२० कोटी रूपयांचा खर्च करण्यात आला. दरम्यान, दरीखोऱ्यात मिसिंग लिंकअंतर्गत केबल–स्टेड पूल बांधण्यात आला आहे. तर, लोणावला तलावाखालून मिसिंग लिंकमधील एक बोगदा जातो. त्यामुळे या प्रकल्पाचे काम अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आणि सर्व नैसर्गिक आपत्तींचा विचार करून करणे आवश्यक होते. त्यानुसार मिसिंग लिंकचे काम करण्यात आल्याचा दावा राज्य सरकार आणि एमएसआरडीसीकडून करण्यात आला होता. तसेच, या मिसिंग लिंकचे उद्घाटन राज्य सरकारच्यावतीने १ मे रोजी करण्यात आले होते. त्यामुळे हा देखील मोठा विकास असल्याचे सत्ताधिकाऱ्यांकडून भासवले जात होते. परंतु, उद्घाटन झाल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांतच पावसाने त्यांच्या विकासाची पोलखोल केली आहे.

यंदा पावसाने खुप उशिरा सुरूवात केली असली तरी, जुन महिन्याच्या शेवटापासून त्याने दमदार हजेरी लावली आहे. गेल्या ४–५ दिवसांपासून राज्यात दमदार पाऊस पडत आहे. त्यामुळे बरेच ठिकाणी दरड कोसळणे, पुर येणे, घरात पाणी शिरणे, कोणी वाहून जाणे अशा अनेक घटना घडल्या आहेत. त्यात सर्वात गंभीर समस्या म्हणजे रस्ताच ‘मिसिंग’ होणे. राज्यात मोठ्या प्रमाणात नव्याने रस्ते बांधले जात आहेत. असे असताना जे जिर्णावस्थेत रस्ते आहेत त्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे प्रवासी वर्गातून वेळोवेळी बोलले जात आहे. यंदाच्या पहिल्याच पावसात अनेक रस्ते आणि पूल वाहून गेलेत, अनेक रस्त्यांवर मोठंमोठे खड्डे पडले आहेत. काही रस्त्यांवरून गाड्या घसरत आहेत. सध्या रस्ता अपघातांचेही प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, त्यावर कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रवासी वर्गाला आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. पूर्वी प्रवासी वर्ग आनंदाने आणि मजेने स्वतःच्या किंवा खासगी तसेच सरकारी वाहनाने प्रवास करायचा. आता मात्र त्याला डोक्यावर आट्या घालून प्रवास करावा लागत आहे. असे असतानाही सत्ताधारी याकडे जाणिपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे बोलले जात आहे. कारण छोट्या मोठ्या डागडुजीपेक्षा नव्याने बनविण्यात आलेल्या रस्त्यावर टक्केवारी भेटत असल्याचे देखील सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे.

नुकताच पहिल्याच पावसाने मिसिंग लिंकची देखील पोलखोल केली आहे. खरंतर ही पोलखोल सत्ताधारी सरकारची असल्याचे बोलले जात आहे. सरकारने या प्रकल्पाचे काम अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आणि सर्व नैसर्गिक आपत्तींचा विचार केल्याचे बोलले जात होते. परंतु, पहिल्याच पावसात या रस्त्यावर खड्डे पडल्याचे व्हिडियो सोशल मिडियावरून निदर्शनास येत होते. आणि त्यातच मोठी पोलखोल म्हणजे या मिसिंग लिंक वरील बोगद्यात अक्षरक्षः धबधबा वाहत असल्याचे चित्र निदर्शनास येत होते. तसेच, प्रचंड प्रमाणात दरड देखील संपुर्ण रस्त्यावर पडली होती. त्याची भीषणता प्रत्यक्षदर्शींनी अनुभवली होती. मुख्यमंत्र्यांनी तात्काळ हा मार्ग बनविणाऱ्या संबंधित यंत्रेणेची चौकशीचे आदेश देणे गरजेचे होते. मात्र, तसे न करता आपली सावरती बाजू घेत विरोधकांना चुकीचं ठरविण्याचे त्यांनी प्रयत्न केल्याचे सर्वसामान्यांमधून बोलेले जात आहे.

ते म्हणाले की, वरून दरड कोसळली आणि पाण्याच्या कमानीवर पडली. त्यामुळे ती कमान तुटली आणि दरड खाली रस्त्यावर पडली. तसेच, तेथील एमरजन्सी व्यवस्थापनेने दाखवलेल्या तत्परतेबद्दल देखील त्यांनी सांगितले. समोर त्याची भीषणता दिसत आहे आणि मुख्यमंत्री म्हणतात, त्याचे व्हिझूअल असे दाखवत आहेत की कनेक्टेड लिंकच तुटली आणि काही लोक असे सुरू झाले की ७ हजार कोटीच पाण्यात गेले म्हणून. आणि ते पुढे म्हणत आहेत की, विरोधकांच्या थोबाडावर टिच्चून हा मिसिंग लिंक पुन्हा सुरू करण्यात आला. परंतु, त्यांचे हे बोलणे कुठेतरी आपली बाजु सावरण्यासाठी असल्याचे सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे. कारण सरकार जर १०० टक्के अभ्यास करून रस्ता बनवत असेल, तर मग दरड बोगद्यात गेलीच नसती. त्याला धबधब्याचे स्वरूप आलेच नसते. हे झाले मिसिंग लिंक बाब त्यांचे वक्तव्य. पण, जिल्ह्यातील इतर रस्त्यांचे काय? येथील पुलांचे काय? येथील रस्त्यांवर चंद्रापेक्षा जास्त खड्डे पडले आहेत. जीर्ण झालेले पुल कधीही पडतील. आणि पुरापासून संरक्षण व्हावे यासाठी जे नव्याने पुल बांधण्यात आले आहेत त्यांचे जोड रस्ते पाण्यात वाहून जात आहेत. अशी परिस्थिती सध्या आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी सत्ताधाऱ्यांकडून मोठंमोठ्या विकासाच्या गप्पा मारल्या जात असतानाच मिसिंग लिंकची पोल खोल झाली. नवनवीन रस्ते बांधले गेले मात्र जिर्णावस्थेतील रस्ते आणि पुल दुर्लक्षीत केले. सरकारच्या भाषेत हाच विकास असेल तर दरवर्षी प्रमाणे यंदाच्या पावसाळ्यात तोच विकास ‘मिसिंग’ झाल्याचे सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे.

---

**लोकसंसद**

## विश्वविजेत्या संघाचा लाजिरवाणा पराभव

ट्रेंट ब्रिज येथे झालेल्या तिसऱ्या टी–२० सामन्यात इंग्लंडने भारतीय संघाला अवघ्या ७६ धावात गुंडाळून १२५ धावांनी धूळ चारल्याने भारतीय संघाला टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आजवरच्या सर्वात मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. आयपीएलच्या सपाट खेळपट्ट्यांवर २००–२५० धावांचा लीलया पाठलाग करणारे स्टार भारतीय फलंदाज इंग्लंडच्या स्विंग आणि उसळी घेणाऱ्या गोलंदाजीसमोर पूर्णपणे ढेपाळले. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना २०१ धावांचा डोंगर उभारला होता. परंतु प्रत्युत्तरात भारतीय संघ जेमतेम ११.४ षटकांत सर्वबाद ७६ धावांत तंबूत परतला. सलग दुसऱ्यांदा टी–२० चे विश्वविजेतेपद जिंकणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाचा हा सलग चौथा लाजिरवाणा पराभव ठरला. या पराभवाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की भारतीय खेळाडूंची आयपीएलमधील नेत्रदीपक कामगिरी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील वेगवान खेळपट्ट्यांवरील सुमार कामगिरी यात जमीन अस्मानाचा फरक आहे. आता दौऱ्यातील उर्वरित सामन्यांत तरी भारतीय फलंदाज वेगवान खेळपट्टीवर उभी राहण्याची मानसिक कणखरता दाखवतील आणि आपल्या तंत्रशुद्ध फलंदाजीचे दर्शन घडवून पराभवाची मालिका खंडित करतील अशी क्रिकेटप्रेमींची अपेक्षा आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

**दिनविशेष**

# कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त

अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची आज जयंती. आज त्यांची १०१ वी जयंती. गुरुदत्तजींच्या १०१ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा विशेष लेख. गुरुदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्मक चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फूल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्मकता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत. आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा.... आरपार मधील बाबूजी धीरे चलना..... सी आय डी मधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फूल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली. केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो.

९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली. देव आनंद यांच्या बाजी आणि जाल या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले तर गुरुदत्त यांनी निर्माण केलेल्या सी आय डी या चित्रपटात देव आनंद हे नायक होते. गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाचा भरात झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळवली. अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले.

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

९ जुलै

१) श्री.दत्तात्रेय रघुनाथ भोसले मारूती-नाका, अलिबाग, दि.९-७-१९४४

२)श्रीम.लक्ष्मी दिनेश वर्मा चेंढरे, अलिबाग दि.९-७-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**कै. श्रेयस राजेश पवार, स्मरणार्थ अलिबाग**

## पनवेल स्मार्ट सिटी जलमय



**खांदा कॉलनी :** मुसळधार पावसामुळे स्मार्ट सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पनवेलचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. शहरातील अनेक रस्ते जलमय झाले असून नागरिकांसह महिला वर्गाला मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. पनवेलमधील कर्नाळा सर्कल परिसरात चारही बाजूंनी मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. रस्त्यावर गुडघाभर पाणी साचल्याने वाहनचालकांना वाहने चालविताना मोठी कसरत करावी लागली, तर पादचाऱ्यांनाही जीव मुठीत धरून मार्ग काढावा लागला. कर्नाळा सर्कललगतच्या अनेक दुकानांच्या दारापर्यंत पाणी पोहोचले असून दुकानदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# डान्सबारचालकांचे ढाबे दणाणले

**● ऑर्केस्ट्राही आता कायद्याच्या कक्षेत; विधेयक सादर**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**राज्यातील डान्सबारच्या नावाखाली चालणाऱ्या अवैध व्यवसायांना पूर्णपणे आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. हॉटेल, रेस्टॉरंट आणि बाररूममधील लाईव्ह म्युझिक परफॉर्मन्स (ऑर्केस्ट्रा) यांना राज्यातील डान्सबार कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मंगळवारी (दि.७) विधानसभेत विधेयक सादर केले.**



ऑर्केस्ट्रा परवान्याचा वापर करून काही आस्थापना डान्स परफॉर्मन्सवरील निर्बंधांना बगल देत असल्याचे निदर्शनास आल्याने ही दुरुस्ती करण्यात येत असल्याचे सरकारच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. यावर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात चर्चा होऊन हा कायदा लवकरच अंमलात येणार आहे.

आतापर्यंत राज्यातील बारमध्ये ऑर्केस्ट्रा सादरीकरणासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत परवानग्या दिल्या जात होत्या. मात्र, अनेक ठिकाणी या परवानगीचा गैरवापर करून ऑर्केस्ट्राच्या आड सर्रासपणे डान्सबार चालवले जात असल्याच्या तक्रारी गृहविभागाकडे आल्या होत्या. या पळवाटेचा गैरफायदा रोखण्यासाठी सरकारने आता थेट ऑर्केस्ट्रा सादरीकरणालाच डान्सबार विरोधी कायद्याच्या कक्षेत आणण्याचा निर्णय घेतला आहे. या कडक अंमलबजावणीसाठी सरकार दोन प्रमुख कायद्यांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करत आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि बार रूम यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा होणार आहे.

विधानसभेत सादर झालेल्या या सुधारणा विधेयकाला राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांची (विधानसभा आणि विधानपरिषद) मंजुरी मिळाल्यानंतर, त्यावर राज्यपालांच्या स्वाक्षरीने या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी संपूर्ण राज्यात सुरू होईल.

सरकारच्या मते, या बदलामुळे ऑर्केस्ट्राच्या नावाखाली नियम मोडणाऱ्या बार मालकांवर थेट कारवाई करता येणार आहे.

### महिलांचे होणारे शोषण थांबवण्यास मदत

सरकारच्या या निर्णयामुळे ऑर्केस्ट्रा बारच्या नावाखाली महिलांचे होणारे शोषण थांबवण्यास मदत होईल, तसेच महिलांच्या प्रतिष्ठेचे रक्षण होणार आहे. ऑर्केस्ट्राच्या नावाखाली नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि अश्लील नृत्यांना प्रोत्साहन देणाऱ्या बार मालकांवर आता थेट डान्सबार विरोधी कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल. ऑर्केस्ट्राच्या आडून चालणाऱ्या छमछमला कायमचा ब्रेक लावण्याच्या दृष्टीने सरकारच्या या भूमिकेमुळे राज्यातील छुप्या डान्सबार संस्कृतीला मोठा दणका बसण्याची शक्यता आहे.

## माथेरानमध्ये अतिवृष्टीचा धुमाकूळ

**● तीन दिवस पाणी, वीज पुरवठ्यासह मोबाईल संपर्क नाही**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरात सध्या सुरू असलेल्या अतिवृष्टीने धुमाकूळ घातला आहे. याचा मोठा फटका माथेरानमधील उद्योग व्यवसायांवर झाला. शहरातील असंख्य झाडे सोसाट्याच्या वाऱ्याने उन्मळून पडली असून तीन दिवसांनी शहरातील वीजपुरवठा पूर्ववत झाला आहे. तर पाणीदेखील घरी पोहचत नसल्याने माथेरानकर प्रचंड संकटातून जात होते. दरम्यान माथेरानमधील मोबाईल फोन सेवा देखील रविवारपासून बंद होती. मंगळवारी ही सेवा पुन्हा कार्यरत झाली आहे.



माथेरानमध्ये पावसाच्या पाण्यासोबत मोठ्या प्रमाणात वादळी वाऱ्याची झुळूक सुरू होती. या सोसाट्याच्या वाऱ्याने शहरात असंख्य झाडे उन्मळून पडली आहेत. त्यात अनेक ठिकाणी झाडे रस्त्यांवर तर काही झाडे घरांवर कोसळून नुकसान झाले आहे. माथेरान पालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने शेकड्यात अशी झाडे बाजूला केली असून झाडे कापून बाजूला करण्यासाठी कर्मचारी वर्गाला अधिक वेळ रस्त्यावर उतरून काम पहावे लागले. रस्त्यावर पडलेली झाडे बाजूला करणे आणि रस्ता पर्यटकांना चालण्यासाठी मोकळा करून देण्याची कसरत आपत्ती व्यवस्थापन ड्युटीवरील कर्मचारी यांना करावी लागली.

माथेरानमध्ये झाडे कोसळून पडण्याचे प्रमाण प्रचंड असल्याने शहरातील वीजपुरवठा तीन दिवस बंद होता. मंगळवारी दुपारी वीज पुरवठा पुरवत झाला असून अजूनही सर्व भागातील वीज पूर्ववत झाला नव्हता. दुसरीकडे शहरातील वीज पुरवठा खंडित असल्याने पुण्याचे पाणी देखील मिळत नव्हते. तर वीज नसल्याने मोबाईल फोनचे नेटवर्क अडीच दिवस बंद होते. या नैसर्गिक आपत्तीचा सर्वात मोठा फटका येथील पर्यटन व्यवसायावरदेखील झाला.

## बीएसएनएलची सेवा विस्कळीत

**आगरदांडा :** मुरूड शहरात बीएसएनएलचे दोन टावर असून मुरूड शहरांसह पंचक्रोशी भागातील ग्राहकांना त्याचा फायदा होतो. परंतु, गेल्या चार दिवसांपासून बीएसएनएलची सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. इंटरनेट सेवा पूर्णपणे ठप्प झाल्याने दैनंदिन कामकाजावर परिणाम झाला आहे. विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी तसेच ऑनलाइन व्यवहार करणाऱ्या नागरिकांना या सेवाबंदीचा मोठा फटका बसत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही सेवा पूर्ववत करण्यात आलेली नसल्याने ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, धान्य वाटप



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई येथील साई ट्रस्टच्या पुढाकाराने कर्जत तालुक्यातील भानसोली व आस्सलपाडा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व धान्य वाटप करण्यात आले.

कर्जत तालुक्यामध्ये सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी आरोग्य आणि शैक्षणिक क्षेत्रात नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्ट काम करते. आदिवासी भागातील विद्यार्थींच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी साई ट्रस्ट नवी मुंबई आणि ट्रू वर्षीप मुंबई यांच्या संयुक्त सहकार्याने कर्जत तालुक्यात अस्सलपाडा व भानसोली येथील आदिवासी वाडीतील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षाणिक साहित्य व धान्य वाटप करण्यात आले. दुर्गम भागामध्ये येणाऱ्या विद्यार्थींना मोठा दिलासा मिळाल्याने या सर्व स्तरावरून कार्याचे कौतुक केले जाता आहे.

यावेळी जयश्री जेठवाणी, अनिता, सुचिता, राधिका घुले, संजय, दिलीप घुले, अनंत कृष्णन, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा पालकवर्ग व शिक्षक उपस्थित होते.

## राज्यभर कृषी महोत्सवाचे आयोजन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यातील शेतकऱ्यांसाठी २२ जुलै ते २२ ऑगस्ट या कालावधीत कृषी विभागामार्फत राज्यभर कृषी महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. या महोत्सवाचे सविस्तर आणि प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी कृषी विभागाला दिले.

मंत्रालयातील दालनात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कृषी महोत्सवाच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. यावेळी कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, दूरदृश्य प्रणालीद्वारे कृषी आयुक्त सूरज मांढरे, स्मार्टचे संचालक एम. जे. प्रदीप चंद्रन, नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी योजना प्रकल्प संचालक मीनल करनवार, कृषी संचालक रफीक नाईकवडी, अविनाश बोरकर, विनयकुमार अवटी, सर्व विद्यापीठांचे कुलगुरू तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कृषीमंत्री भरणे म्हणाले की, यंदाचे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे करण्यात येत असून, महिला शेतकरी विधेयकही विधिमंडळात सादर करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर कृषी महोत्सवात महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाला विशेष प्राधान्य देत त्यांच्यासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि विविध कृषीविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

## अनधिकृत बाईक टॅक्सींवर कर आकारणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अनधिकृत बाईक टॅक्सींमुळे सरकारचा महसूल बुडतो. यापुढे अशा बाईक- टॅक्सीजना प्रती दिनी पाच रुपये, तर प्रत्येक फ [illegible]रीमागे दोन रुपये कर आकारण्यात येईल अशी घोषणा परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत प्रश्नोतर तासात केली. शिवसेना सदस्य दिलीप लांडे यांनी राज्यातील अनधिकृत बाईक टॅक्सींवर कारवाई करण्याविषयीचा प्रश्न विचारला होता. राज्यात ओला-उबेर-रॅपिडो तसेच इतर बाईक टॅक्सी इतर काही ॲप्स माध्यमातून परवानगी न घेता नियमबाह्य अनधिकृत बाईक-टॅक्सी सुरु आहेँ याकडे लांडे यांनी लक्ष वेधले. परिवहनमंत्री सरनाईक यांनी यासंदर्भात उत्तर देताना आधी अंशतः खरे असे उत्तर दिले. महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम,२०२५ तरतुदीनुसार अर्जदाराने खासगी दुचाकी वाहनांच्या रे प्रवासी वाहतूक करु नये. तसेच १८-८-२५ रोजी प्राधिकरणाने मेसर्स उबेर इंडिया, रोपेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस, हे.ॲनी टेक्नॉलॉजीस यांना तीस दिवसांसाठी मुंबई महानगर क्षेत्रात तात्पुरता परवाना जारी करण्यास मान्यता दिल्याचे सांगितले.

## अल्पवयीन मुलाचा बुडून मृत्यू

**पालघर :** नालासोपारा पूर्वेतील वलईपाडा, गरळपाडा येथील जय अंबे चाळीत राहणारा नमन केसरवाणी (१३) शाळेला सुट्टी असल्याने मित्रांसोबत बाहेर फिरण्यासाठी गेला होता. परिसरातील मैदानात पावसाचे मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. खेळता-खेळता तो आणि त्याचे मित्र त्या पाण्यात उतरले. मात्र पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी त्याला पाण्याबाहेर काढून रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## कोमसाप रायगडची वर्षा सहल उत्साहात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा रोहा, तळा, मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार व रविवार दि.४ व ५ जुलै रोजी तळा तालुक्यातील महुरे येथील स्मिहील फार्म हाऊस येथे साहित्यिक वर्षासहल उत्साहात पार पडली.




या वर्षा सहलीमध्ये बहारदार कवी संमेलन, कराओके गायन, साहित्यिक खेळ व पोहण्याचा मनमुराद आनंद घेण्यात आला. या सहलीमध्ये मुरुड, रोहा, पाली व तळा येथून २४ साहित्यिकांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. कवी संमेलनात पाऊस, जीवन, ईश्वर, नातीगोती, प्रेम, आभाळ अशा विविध विषयांवर कवींनी उत्तम रचना सादर केल्या.

अध्यक्षस्थानी कोमसाप रायगड जिल्हा अध्यक्ष संजय गुंजाळ होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा समन्वयक रायगड भूषण सुखद राणे, नवी मुंबई महापालिका सहाय्यक आयुक्त शिक्षण विभाग दिपाली दिवेकर व पाली शाखा अध्यक्ष धनंजय गद्रे गुरुजी उपस्थित होते. कवी संमेलनाची जबाबदारी तळा शाखा, साहित्यिक खेळ मुरुड शाखा व कराओके गायन रोहा शाखेने उत्तम नियोजन केले.

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

**ई-निविदा सुचना**

**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील खालील नमूद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदनीकृत ठेकेदाराकडुन मागविण्यात येत आहे.

| अ क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (GSTसोडुन) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पमपा/ विद्युत/ ०२/ २०२६ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामधील मध्यवर्ती वातानुकूलित यंत्रणेची तीन वर्षाकरिता दैनंदिन परिचालन देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे. | रु. ३३,०९,५४०.०० | रु.३३,०९५.०० | रु.५९०.०० |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनेवल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

जा.क्र./पमपा/विद्युत/२७२६/प्र.क्र.०१/६८८/२०२६

दिनांक- ०८/०७/२६

sd/-
**अतिरिक्त आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

## समुद्राकडे जाणारा रस्ता गेला वाहून

**थेरोंडा गावातील कोळी बांधव संकटात**

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक ठिकाणी मोठे नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीचा फटका रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीतील थेरोंडा गावालाही बसला आहे.

सतत कोसळणाऱ्या पावसामुळे समुद्राकडे जाणारा महत्त्वाचा रस्ता अक्षरशः वाहून गेला. जवळपास दोन ते तीन फूट माती वाहून गेल्याने या रस्त्याचे रूपांतर ओढ्यात झाले आहे. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणे धोकादायक बनले असून स्थानिक नागरिकांसह मच्छिमारी करणाऱ्या कोळी बांधवांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे.

विशेषतः होड्या समुद्रातून बाहेर काढणे व पुन्हा समुद्रात नेणे अत्यंत कठीण झाले असून त्यांच्या दैनंदिन उपजीविकेवर याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.



या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने तातडीने पाहणी करून हा रस्ता पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर काम हाती घ्यावे, अशी मागणी स्थानिक कोळी बांधवांनी केली आहे. तसेच संभाव्य धोका लक्षात घेता नागरिकांनी या मार्गाचा वापर टाळावा, असे आवाहनही करण्यात येत आहे.

# निवडक

## विविध कार्यक्रमांनी वाढदिवस साजरा




**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांचा वाढदिवस माणगावात विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मातोश्री गंगुबाई शिंदे सिबीएससी स्कूल माणगाव याठिकाणी त्यांच्या असंख्य चाहत्यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. ॲड. राजीव साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त माणगावात १ जुलै ते ७ जुलै दरम्यान 'झाडे लावा, झाडे जगवा' असा ग्रामस्थांना संदेश देत वृक्षारोपण सप्ताह कार्यक्रम घेण्यात आला. तसेच दि.७ जुलै रोजी मातोश्री गंगुबाई शिंदे सिबीएससी स्कूल माणगाव याठिकाणी केईएम रुग्णालय परेल मुंबई रक्तपेढी टीमचे प्रमुख समाज विकास अधिकारी डॉ.प्रकाश सावंत व त्यांचे सहकारी तसेच जनकल्याण रक्तपेढी महाड यांच्या सौजन्याने रक्तदान शिबीर उत्साहात पार पडले. तसेच यावेळी संजयआण्णा साबळे संकुल माणगाव याठिकाणी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत भूमीपूजन, मातोश्री गंगुबाई शिंदे सिबीएससी स्कूल माणगाव येथे स्विमिंगपुलचे उद्घाटन असे विविध सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडले.

## शिवम धुमाळ तालुक्यात पहिला

**नेरळ :** अभिनव ज्ञानमंदिरचा विद्यार्थी शिवम धुमाळ याने दमदार कामगिरी केली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यात प्रथम, तर जिल्ह्यात आठवा क्रमांक मिळवला आहे. कर्जत येथील अभिनव ज्ञानमंदिर प्रशालेने पुन्हा एकदा आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे. शाळेचा विद्यार्थी शिवम योगेश धुमाळ याने शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत तालुक्यात प्रथम आणि रायगड जिल्ह्यात आठवा क्रमांक पटकावला आहे. शिवमच्या यशामागे त्याचे वडील योगेश धुमाळ व आई रेश्मा धुमाळ यांचे प्रेरणादायी सहकार्य लाभले आहे. घरातून मिळालेली शिस्त, प्रोत्साहन आणि अभ्यासासाठी अनुकूल वातावरण यामुळे त्याला आपल्या क्षमतांचा पूर्ण उपयोग करता आला. याशिवाय शाळेच्या म्हात्रे यांचे मार्गदर्शन आणि मुख्याध्यापक विलास बबन शिंदे यांचे नेतृत्वही त्याच्या यशात महत्त्वाचे ठरले. शिवमची शैक्षणिक वाटचाल सुरुवातीपासूनच उज्वल राहिली आहे. त्याची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली असून त्याने भारत टॅलेंट सर्च परीक्षेत रायगड जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवून आपल्या गुणवत्तेची छाप आधीच पाडली आहे.






## आगरी सामाजिक संस्थेचा वर्धापनदिन

**अलिबाग :** आगरी सामाजिक संस्था अलिबागचा दहावा वर्धापन दिन बहिरोळे हायस्कूलच्या सभागृहात जे.पी. घरत यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि.४) उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणारे सुनीलअप्पा थळे म्हणाले की, आगरी माणसांची जिगरबाज वृत्ती असल्याने तो विविध क्षेत्रात बाजी मारीत आहे. आगरी माणसांसाठी आगरी भवन होणे, आजच्या काळाची गरज आहे. आगरीभवन निर्मितीसाठी आपण सगळे कंबर कसून कामाला लागू या. तर अध्यक्षीय भाषणात जे.पी. घरत यांनी आगरी सामाजिक संस्था चिकाटीने सामाजिक कार्य करीत असून, संस्था अधिक गतिमान होऊन यशवंत होईल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रम प्रमुख विश्वनाथ पाटील यांनी प्रास्ताविक भाषण केले. तर, कैलास पिंगळे व सहकाऱ्यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी कैलास पिंगळे म्हणाले, आम्ही दहा वर्षात अनेक उपक्रम हाती घेऊन यशस्वी केले. आगरीभवन हे उराशी जपलेले स्वप्न लवकरच सत्यात आणू. त्यासाठी सर्वांचेच सहकार्य घेऊ व कार्यामध्ये यशस्वी होऊ. याच कार्यक्रमात शरद पाटील यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.



## झाडासह डोंगराची माती रस्त्यावर

**पाली /बेणसे :** सुधागड तालुक्यात सर्वत्र मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे गोमाशी ते फणसवाडी मार्गावर एक मोठी दुर्घटना टळली. मुसळधार पावसामुळे रस्त्यालगत असलेले एक मोठे झाड आणि डोंगराची माती अचानक खचून थेट मुख्य रस्त्यावर आली. यामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती आणि नागरिकांची मोठी गैरसोय निर्माण झाली होती. या घटनेची माहिती मिळताच सुधागड तालुका पंचायत समितीचे उपसभापती संदेश शेवाळे यांनी तात्काळ परिस्थितीची दखल घेतली. त्यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने हालचाली केल्या आणि संबंधित यंत्रणेला पाचारण केले. फणसवाडी ग्रामस्थ जगदीश तुकाराम जाधव, महेंद्र नारायण शिंदे व समाधान वसंत जाधव यांच्या सहकार्याने घटनास्थळी युद्धपातळीवर काम सुरू करण्यात आले. रस्त्यावर आलेले ते भलेमोठे झाड आणि डोंगराच्या मातीचा ढिगारा बाजूला करण्यात आला. प्रशासनाच्या आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या तत्परतेमुळे हा रस्ता अगदी काही वेळातच पूर्ववत करण्यात यश आले. ऐन पावसाळ्यात लोकप्रतिनिधींनी दाखवलेल्या या तत्परतेबद्दल वाहनचालक आणि परिसरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

# निवडक



## रसायनीला मुसळधार पावसाचा फटका

**रसायनी :** रसायनी पाताळगंगा परिसरात गेल्या तीन दिवस सुरु असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत केले आहे. नविन पोसरी मोहोपाडा येथील जय प्रेसिजन कंपनीमागील परिसरात वाढणाऱ्या पाण्याचा प्रवाहामुळे भिंत कोसळली. तर मोहोपाडा येथील स्मशानभूमी परिसरात डोंगरावरील माती वाहून आल्याने भराव तयार झाला. रसायनी स्टेट बँक समोरील फिडरवर झाड कोसळले तसेच मोहोपाडा थांबा, विजवितरण कार्यालयासमोरील एमआयडीसी रायगड को हौसिंग सोसायटी, एचओसी कॉलनी गेटजवळ, मोहोपाडा रिक्षा थांबा, कांबे थांबा रस्तालगत, रसायनी परिसरातील अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या उन्मळून पडल्या. त्यामुळे सोमवारी पहाटेपासून मंगळवार दुपारपर्यंत ३० तास विजपुरवठा खंडीत होता. विजवितरण कर्मचाऱ्यांनाही शर्थीचे प्रयत्न करावे लागले. मुसळधार पावसामुळे पाताळगंगा नदी-नाले दुथडी भरून वाहात आहेत. सिध्देश्वरी कराडे परिसरात, रिलायन्स इंडस्ट्रीज कंपनीसमोर पाणी रस्त्यावर आल्याचे दिसून आले. रसायनी परिसरात ठिकठिकाणी पाणी साचले असून रस्त्यांचीही चाळण झाल्याचे दिसून आले. प्रशासनाने सखल भागातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देत सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन केले आहे.



## चिमुकल्याला पुन्हा मिळाली बाबांची कुशी

**महाड :** महाड एमआयडीसी पोलिसांनी अवघ्या तीन दिवसांत सात महिन्यांच्या चिमुकल्यासह घरातून निघून गेलेल्या महिलेचा शोध घेऊन दोघांनाही सुखरूप ताब्यात घेतले. या कारवाईमुळे वडिलांपासून दुरावलेल्या चिमुकल्या प्रिन्सची पुन्हा आपल्या वडिलांशी भावनिक भेट घडवून आणण्यात पोलिसांना यश आले. तीन दिवसांपूर्वी संबंधित महिला आपल्या सात महिन्यांच्या बालकाला घेऊन घरातून निघून गेली होती. त्यामुळे बालकाची त्याच्या वडिलांपासून ताटातूट झाली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांनी तात्काळ तपास पथक रवाना करून शोधमोहीम सुरू केली. या शोधकार्यात खबऱ्यांचे जाळे सक्रिय करण्यात आले तसेच दिवस-रात्र तांत्रिक तपास करण्यात आला. तपास पथकातील पोलीस हवालदार प्रफुल्ल पवार व पोलीस शिपाई बल्लाळ यांनी कौशल्यपूर्ण तपास करून संबंधित महिला व चिमुकल्या प्रिन्सचा शोध घेत त्यांना शिवाजीनगर, पुणे येथून सुखरूप ताब्यात घेतले.

## नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह पूर्ववत

**खांदा कॉलनी :** पनवेल महानगरपालिका हद्दीतील भिंगारी येथील गाढी नदीवरील पुलाखाली मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाहून येऊन पुलाच्या खांबांना अडकली होती. त्यामुळे पुलाखाली सुमारे पाच ते सहा फूट उंचीचा जलपर्णीचा थर तयार झाला होता. या थरामुळे नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह अत्यंत संथ झाला असून पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली होती. ही बाब पनवेल महानगरपालिकेच्या निदर्शनास येताच प्रशासनाने तातडीने दखल घेत पोकलेन मशीनच्या सहाय्याने पुलाखाली अडकलेली संपूर्ण जलपर्णी हटविण्याची मोहीम हाती घेतली. या कारवाईमुळे नदीपात्रातील अडलेला पाण्याचा प्रवाह पुन्हा सुरळीत करण्यात आला. दरम्यान, जलपर्णीचा काही भाग पाण्याबरोबर वाहत जाऊन कच्छी मोहल्ला परिसरातील भारतनगरलगत असलेल्या पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या नाल्यातही अडकला होता. त्या ठिकाणीही पालिकेने दोन जेसीबीच्या सहाय्याने जलपर्णी हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले. पालिकेच्या तत्पर कारवाईमुळे नदीपात्र तसेच नाल्यातील पाण्याच्या प्रवाहाला कोणताही अडथळा निर्माण झाला नाही.

## कृषी पर्यटन व्यावसायिक बैठक

**अलिबाग :** पर्यटन क्षेत्रातील वाढत्या संधी आणि कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी अलिबागमध्ये 'ॲग्रो टुरिझम स्टेकहोल्डर' या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक शुक्रवारी (दि.१०) वरसोली येथील 'पर्णकुटी' येथे पार पडणार आहे. सायंकाळी ३ ते ५ या वेळेत होणाऱ्या या बैठकीमध्ये अलिबाग आणि परिसरातील कृषी पर्यटन केंद्रचालक, शेतकरी, पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिक आणि या क्षेत्राशी संबंधित विविध घटक (स्टेकहोल्डर्स) एकत्र येणार आहेत. या बैठकीत कृषी पर्यटनासमोरील सद्य आव्हाने आणि त्यावरील उपाय, शासनाच्या कृषी पर्यटन धोरणाची अंमलबजावणी आणि मिळणारे लाभ, पावसाळी व हिवाळी पर्यटनासाठी नवनवीन संकल्पना आणि मार्केटिंग धोरण, स्थानिक शेती उत्पादनांना पर्यटनाच्या माध्यमातून बाजारपेठ मिळवून देणे या विषयांवर चर्चा केली जाणार आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail Contact- 9823585321
- अलिबागमध्ये, फार्म हाऊस सांभाळण्यासाठी व जेवणाकरता येणारी स्त्री अथवा पुरूष व्यक्ती पाहिजे. संपर्क : ९४२३८९०२९५
- कामासाठी माणसे/मुलगे पाहिजे. १) कंपनीचे मोबाईल विक्रीसाठी दुकानदारांकडे उरण, उलवा/महाड-माणगाव, पेण-पोयनाड, २) डिलेवरी एस.टी.ने अथवा बाईकने (पेण-अलिबाग) (रेवदंडा-मुरूड-अलिबाग) लायसन्स पाहिजे. (बाईक आमची) ३) कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. ४) पार्ट/फुल टाईम चालेल. (संपर्क : ८८८८२२०२२१)
- Vacancy for Furniture Workshop office Education-Graduation. Experience-2 years, Location- Bamansure, chondhi Contact- 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# उजवातीर अष्टमी कालव्याला खांड

### शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान; पाटबंधारे खात्याकडून उपाययोजना करण्याची मागणी

**| कोलाड | प्रतिनिधी |**

रायगडसह रोहा तालुक्यात गेली चार पाच दिवस मुसळधार पावसाने हाहाकार उडविला आहे. नदी नाले तुडूंब झाले. एवढेच नाही तर मोठी पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने शेती जलमय झाली. तर डोळवहाल बंधारा तसेच कुंडलीकेतून बारमाही वाहणारा उजवातीर अष्टमी कालव्याला देवकान्हेनजीक मुसळधार पावसामुळे भली मोठी खांड गेली. त्यामुळे पुराच्या पाण्यातून वाहून आलेले दगड-माती-गाळ हा खालील संपूर्ण शेत जमिनीत गेला. परिणामी येथील शेकऱ्यांनी खरीप हंगामात लागवडीसाठी सज्ज केलेल्या भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. तरी यावर पाटबंधारे विभागाने लवकरात लवकर उपाय योजना कराव्यात, अशी मागणी येथील शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.



आधीच पावसाला उशिराने सुरूवात झाल्याने अनेकांनी खरीप हंगामातील पेरणी उशिराने केली.

### पूरपरिस्थितीमुळे बळीराजा मेटाकुटीला

यावर्षी उशिराने पाऊस पडला. त्यानंतर शेतकऱ्यांनी नांगराने तसेच अत्याधुनिक यंत्राच्या साहाय्याने पेरणीची कामे केली. मात्र, गेली काही दिवस पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली. भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने बळीराजा मेटाकुटीला आला आहे.

तर पाऊस सुरू होताच काही शेतकऱ्यांनी भाताची पेरणी करून शेतात लागवडीसाठी अत्याधुनिक यंत्राच्या मदतीने नांगरणी सुरू केली. परंतु, मागील काही चार पाच दिवसांपासून पावसाचे प्रमाण वाढल्याने अनेकांचे पेरलेले भात वाहून गेले. तर अधिकची पूरपरिस्थिती उद्‌भवल्याने अनेकांचे नुकसान झाले आहे. काही शेतात पुरामुळे मातीचा गाळ बसल्याने ती लागवडीसाठी पुन्हा ताकदनीशी मेहनत करून नांगरणी करावी लागेले. काही ठिकाणी पावसाळी वाहणारे मोठमोठ्या नाल्यांना तर काही ठिकाणी कालव्याला अशा प्रकारे खांडी गेल्याने मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाल्याचे खांब देवकान्हे भागात दिसून येत आहे.

देवकान्हेनजीक कालव्याला खांड गेल्याचे सदरील पाटबंधारे खात्याला कळविले असून त्यांनी त्यांची यंत्रणा पडलेल्या खांडीवर युद्धपातळीवर उपाय योजना करत आहेत. तसेच पाटबंधारे खात्याचे विभागीय अधिकारी कदम यांनी पाहणी करून खांड बुजविण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत.

> "पूरपरिस्थितीमुळे या परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांचे पेरणी पिकांचे नुकसान झाले आहे. त्याचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी चिल्हे देवकान्हे विभागीय शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे."
> — किशोर भोईर, शेतकरी

## गटार लाईनवरील मॅनहोलना अखेर झाकण

**| कोलाड | प्रतिनिधी |**

आंबेवाडी बाजारपेठेतील गटार लाईनवरील उघडे मॅनहोल नागरिकांसाठी धोकादायक ठरत होते. विशेषतः पावसाळ्यात मॅनहोल दिसत नसल्याने पादचारी, दुचाकीस्वार, वाहनचालकांना अपघाताचा धोका निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणेकडून मॅनहोलवर लोखंडी झाकण बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

यामुळे परिसरातील नागरिकांनी अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली समस्या अखेर मार्गी लागल्याची भावना व्यक्त केली आहे. झाकण बसवल्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्यासही मदत होणार असून, दुर्घटनांचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

गेली वर्षाभरापासून गटारावरील झाकण बसविण्यात यावे, अशी मागणी अनेकवेळा स्थानिक नागरिकांकडून करण्यात आली होती. याची बातमी ही अनेकवेळा वृत्तपात्रातून देण्यात आली होती. यानंतर अल्प कालावधीत आंबेवाडी बाजारपेठेतील गटारावरील झाकण बसविण्यात आले. यामुळे स्थानिक नागरिकांकडून प्रशासनाचे आभार मानले जात आहेत.

## पुरामुळे भातशेतीचे, दुकानदारांचे नुकसान

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

अंबा नदीला आलेल्या पुरामुळे सलग दोन दिवस नागोठणे शहरातील एसटी स्थानक परिसर, छ. शिवाजी चौक परिसर, बाजारपेठ, कोळीवाडा, बंगले आळी, मोहल्ला भागातील परिसर यांसह विविध भागाला व विभागातील अनेक गावांना पुराने दोन दिवस वेढा घातला होता. त्यामुळे नागोठणे शहरातील किराणा माल, कपडे, जनरल स्टोअर आदींसह विविध दुकानदारांचे दुकानातील माल भिजल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच विभागातील भातशेती पुराच्या पाण्याखाली गेल्याने राब कुजले आहेत. या पुरामुळे नागोठणे विभागातील शेतकऱ्यांचे



मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांनी शासनाकडे नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

नागोठणे विभागातील व नागोठण्याजवळ असलेल्या पाटणसई, वरवठणे, पिगोंडे, कोलेटी, पळस, कोंडगाव, ऐनघर, वांगणी आदी ग्रामपंचायत हद्दीतील गावांतील शेतकऱ्यांची अंबा नदीलगत असलेली शेकडो एकर शेती पाण्याखाली जाऊन नुकसान झाले. त्यामुळे शासनाने या शेतीची त्वरित पाहणी करून नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी नागोठणे विभागांतील शेतकऱ्यांकडून होत आहे.

दरम्यान सध्या पुरामुळे नुकसान झालेली दुकाने व घरांचे पंचनामे लवकरच सुरु करण्यात येतील. शेतीच्या नुकसानीचे पंचनामे हे कृषी खाते, तलाठी व ग्रामसेवक यांच्याकडून संयुक्तपणे होतील, असे रोहा तहसील कार्यालयातून स्पष्ट करण्यात आले आहे.

## धोकादायक झाडांची तातडीने छाटणी करावी

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

खांदा कॉलनी परिसरातील सार्वजनिक रस्ते, शाळा, उद्याने आणि निवासी भागांमध्ये उभ्या असलेल्या अतिउंच, जीर्ण व धोकादायक झाडांची तातडीने पाहणी करून त्यांची छाटणी करावी. तसेच आवश्यकतेनुसार हटविण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाचे कार्याध्यक्ष महादेव कुंडलिक वाघमारे यांनी पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे खांदा कॉलनीतील विविध ठिकाणी



झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या असून अनेक वाहनांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवितासह मालमत्तेलाही गंभीर धोका निर्माण झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मुंबईतील चेंबूर येथील डायमंड गार्डन परिसरात धोकादायक झाड कोसळून ११ वर्षीय विद्यार्थी विहान श्रीवास्तव याचा मृत्यू झाल्याच्या घटनेचा उल्लेख करत, अशा प्रकारची दुर्घटना खांदा कॉलनीत घडण्यापूर्वीच प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे वाघमारे यांनी म्हटले आहे.


निवेदनात सेक्टर-२ गार्डन परिसर, कृष्णा टॉवर, स्वागत सोसायटी, पाटील कॉम्प्लेक्स, साईबाबा सोसायटी, हरिदर्शन सोसायटी, मंगलदीप सोसायटी, सेक्टर-८ महात्मा शाळेसमोरील परिसर, साईप्रसाद सोसायटी,

### वृक्ष प्राधिकरण विभागाला निवेदन

अहिल्यादेवी होळकर गार्डन, नील लेक, मंगलमूर्ती, निळकंठ, सेक्टर-२ गणेश प्लाझा तसेच खांदा कॉलनीतील इतर धोकादायक झाडांची महानगरपालिकेने तातडीने पाहणी करून, छाटणी आणि आवश्यकतेनुसार हटविण्याची मोहीम हाती घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, वेळेत कारवाई न झाल्यास भविष्यात होणाऱ्या कोणत्याही जीवितहानी किंवा मालमत्तेच्या नुकसानीची संपूर्ण जबाबदारी संबंधित अधिकारी आणि महानगरपालिकेवर राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

## कमलाकर गानू यांचे निधन

**चौक :** चौक येथील गणेश मूर्तीकार, वृत्तपत्र विक्रेते कमलाकर लक्ष्मण गानू (८२) यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन



झाले. गानू घराण्याचे गणेश मूर्ती करण्याची दीडशे वर्षाची परंपरा असून त्यांनी अनेक वर्ष वृत्तपत्र विक्रेते म्हणून काम केले. कमळाकर गानू (आबा) हे गरजूंना कावीळ, मुतखडा, मुळव्याध, नागीण यावर आयुर्वेदिक औषधे देत असत.

## दहिवली पुलाची दयनीय अवस्था

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील उल्हास नदीवर असलेले दहिवली मालेगाव १४ तास पाण्याखाली होते. या दहिवली पुलावरून ३५ गावातील ग्रामस्थ नेरळ-कर्जतकडे वाहतूक करत असतात. या पुलावरून पाणी गेल्याने पुलावरील डांबरीकरण उखडून गेले आहे.

उल्हास नदीवर दहिवली-मालेगाव येथे असलेला पूल शनिवारी आणि रविवारी पाण्याखाली गेला होता. पहिलाच मोठा पूर झाल्याने या पुलाचे डांबरीकरण पूर्णपणे निघून गेले असून मोठमोठे खड्डे तयार झाले आहेत. या खड्ड्यातून प्रवाशांना आपले जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. तसेच नदीच्या पुलावरील सुरक्षा कठडे व रेलिंग पूर्णपणे नादुरुस्त झाल्यामुळे



दहिवली पुलाची दयनीय अवस्था पाहायला मिळत आहे. सुरक्षा कटड्याच्या बाजूला नदीमध्ये वाहून येणारा कचरा साचल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. याकडे प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून रस्ता स्वच्छ करून खड्डे भरून घ्यावे, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

## तनुश्रीचे स्कॉलरशिप परीक्षेत यश

**बोर्लीपंचतन :** संस्थापक रा. पां. दिवेकर दांडगुरी हायस्कूलची इयत्ता आठवीमध्ये शिकत असलेली विद्यार्थीनी तनुश्री बाबुराव जगनर हीने प्राथमिक स्कॉलरशिप परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. तिने श्रीवर्धन



तालुक्यातून प्रथम व रायगड जिल्ह्यातून अकरावा क्रमांक प्राप्त करण्याचा बहुमान पटकावला आहे. त्यामुळे तिचे विद्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक विद्यालयाचे सभापती वसंत राऊत व सर्व सदस्य यांनी कौतुक व अभिनंदन केले. तसेच दांडगुरी गावांच्या ग्रामस्थांकडून अभिनंदन करत तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## मोरी बुजवल्याने रस्त्यावर पाणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत-कल्याण या मार्गावर दिवस-रात्र मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. मात्र गेल्या चार ते पाच दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे रायगड हॉस्पिटल गेटच्या पुढील बाजूस रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या ठिकाणी पूर्वी पावसाचे पाणी निचरा होण्यासाठी मोऱ्या पाण्याचे वाहून जाण्याचे मार्ग टाकण्यात आले होते. मात्र संबंधित ठेकेदाराने रस्त्याचे काम करताना या मोऱ्या बंद केल्याचे समोर आले आहे. परिणामी समोरील डोंगरावरून येणाऱ्या पावसाच्या पाण्याला निचऱ्याचा मार्ग उपलब्ध नसल्याने ते थेट रस्त्यावर साचत आहे.



रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे वाहनचालकांना आपली वाहने अतिशय सावधगिरीने चालवावी लागत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी पाण्याची पातळी लक्षात न आल्याने अपघात होण्याचा धोका अधिक वाढला आहे. दुचाकीस्वारांसाठी ही परिस्थिती अधिकच धोकादायक ठरत असून, एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानिकांनी व वाहनचालकांनी याबाबत प्रशासनाकडे तक्रारी केल्या असून, संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य त्या उपाययोजना तात्काळ करण्यात याव्यात, अन्यथा भविष्यात गंभीर दुर्घटना घडू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ तेथील मोरी खुली करून पाण्याचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी वाहनचालक करीत आहेत.

### आंग्रे नगर परिसरात किराणा किटचे वाटप | उपसरपंच संतोष मोरेंची सामाजिक बांधिलकी

# रेवदंड्यात पूरग्रस्तांना माणुसकीचा हात

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

मुसळधार पावसामुळे रेवदंडा गावातील आंग्रेनगर परिसरातील अनेक घरांमध्ये पाणी शिरून नागरिकांचे मोठे नुकसान झाले. यावेळी संकटग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी रेवदंडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच संतोष (बाबू) मोरे यांनी तातडीने पुढाकार घेत पूरग्रस्तांना किराणा किटचे वाटप केले. संकटकाळात लोकप्रतिनिधी म्हणून केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष मदतीचा हात पुढे करत त्यांनी सामाजिक बांधिलकीचे



दर्शन घडवले.

आंग्रे नगर परिसरातील अनेक कुटुंबांच्या घरात पाणी शिरल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले होते. अशा परिस्थितीत उपसरपंच संतोष (बाबू) मोरे यांनी प्रभावित कुटुंबांची भेट घेत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर आवश्यक जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असलेल्या किराणा किटचे वितरण करून गरजू कुटुंबांना मोठा दिलासा दिला.

यावेळी आंग्रे नगरमधील कार्यकर्ते दिलीप धुमाळ यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी प्रत्येक घरात जाऊन स्वतः किराणा किट पोहोचवण्याची जबाबदारी पार पाडत मदतकार्य अधिक प्रभावी केले. पूरग्रस्त कुटुंबांपर्यंत मदत थेट पोहोचावी, यासाठी त्यांनी केलेल्या परिश्रमांचेही नागरिकांकडून कौतुक करण्यात आले. या मदतीबद्दल आंग्रे नगरमधील नागरिकांनी उपसरपंच संतोष (बाबू) मोरे यांचे मनापासून आभार व्यक्त केले. 'पूरामुळे आम्ही मोठ्या अडचणीत सापडलो होतो. अशा वेळी कोणतीही अपेक्षा न ठेवता मदतीला धावून आलेले बाबू मोरे आमच्यासाठी देवदूतच ठरले आहेत', अशा भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केल्या.

रेवदंडा हे रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे गाव म्हणून ओळखले जाते. जिल्ह्याच्या आणि राज्याच्या राजकीय घडामोडींवर प्रभाव टाकणारे गाव अशी रेवदंड्याची स्वतंत्र ओळख आहे. या गावातील लोकप्रतिनिधी संकटकाळात जनतेच्या पाठीशी किती ठामपणे उभे राहतात, याचे प्रत्यंतर संतोष (बाबू) मोरे यांच्या या कृतीतून पुन्हा एकदा आले आहे.

### सेवा हीच खरी लोकप्रतिनिधीची ओळख

आजच्या काळात अनेकदा लोकप्रतिनिधींवर टीका होत असताना, संकटात सापडलेल्या नागरिकांच्या घरापर्यंत मदत पोहोचवून संतोष मोरे यांनी सेवा हीच खरी लोकप्रतिनिधीची ओळख असल्याचे दाखवून दिले आहे. पूरग्रस्तांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी पुढे सरसावलेला हा माणुसकीचा हात रेवदंडा परिसरात चर्चेचा विषय ठरत होत आहे.

# कोळीवाडा ते बंदर रोड रस्ता होण्याची परिसरातील नागरिकांची मागणी

**पनवेल :** गाढी नदीला लागून असलेल्या कोळीवाडा ते बंदर रोड पकटीमार्गे नवीन रस्ता करण्याची मागणी नागरिक करीत असून याबाबत महाराष्ट्र शासनाच्या मेरीटाईम बोर्डने लक्ष घालण्याची मागणी जोर धरु लागली आहे.

दरवर्षी मुसळधार पावसामध्ये पनवेल कोळीवाडा पाण्याखाली जातो व त्यांचे अतोनात नुकसान होते. कोळी बांधव हे नागरिकांच्या मदतीला नेहमीच धावत असतात. या भागातून पकटी मार्गे बंदर रोड येथे एक वेगळा मार्ग काढण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून नागरिकांमधून करण्यात येत आहे.

## जाहिर समन्स

नि:१२/ड
प्रोसेस जमा रू.
अपिलार्थी तर्फे वकील श्री.अमित देशमुख
दिवाणी अपिल नंबर ३३/२०२५

**माणगाव येथील मा. संजीव तुकाराम भालेराव, जिल्हा व सत्र न्यायाधिश साो. यांचे न्यायालयात**

चंद्रकांत भाऊ ठमके — अपिलार्थी

विरूद्ध

तन्वीर अलीसाहेब नाडकर — उत्तरार्थी

या जाहिर समन्सद्वारे उत्तरार्थी तन्वीर अलीसाहेब नाडकर राहणार वरचा मोहल्ला, मु.पो.ता.रोहा, जि.रायगड यांस कळवण्यात येते की, अपिलार्थी श्री. चंद्रकांत भाऊ ठमके व इतर यांनी तुमचे विरूद्ध मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साो. माणगाव यांचे न्यायालयात विशेष दिवाणी दावा क्र. ३९२/२०२३ दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये मा.न्यायालयाने दि. ११.०९.२०२५ रोजी न्यायानिर्णय देवून सदरचा दावा निकाली काढला आहे. त्यामुळे श्री.चंद्रकांत भाऊ ठमके व इतर यांनी तुमचे विरूद्ध मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश साो. माणगाव यांचे न्यायालयात सदर न्यायनिर्णयाला आव्हानित करून तुमचे विरूद्ध सदरचे दिवाणी अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलाचे कामी उत्तरार्थी यांस काढलेल्या समन्सची बजावणी होत नसल्याचे आढळून आले आहे. उत्तरार्थी यांचा उपरोक्त पत्ता हा योग्य व बरोबर असुनही उत्तरार्थी तन्वीर अलीसाहेब नाडकर यांचेवर समन्सची बजावणी होत नाही. उत्तरार्थी हे स्वत:वर समन्सची बजावणी होऊ देत नसल्याची खात्री वादी यांची झाल्याने उत्तरार्थी तन्वीर अलीसाहेब नाडकर यांचे विरूद्ध जाहिर समन्सद्वारे समन्सची बजावणी व्हावी यासाठी वादीने मा. न्यायालयात अर्ज दिला होता व तो मा. न्यायालयाने मंजुर केला आहे.

सबब, उपरोक्त उत्तरार्थी तन्वीर अलीसाहेब नाडकर यांस या जाहिर समन्सद्वारे कळविण्यात येते की, दि.०६/०८/२०२६ रोजी आपण स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी किंवा वकील यांचेमार्फत मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश साो. माणगाव यांचे न्यायालयात सकाळी ठीक १०.३० वाजता हजर राहावे व सदरहु अपिलाचे कामी आपले म्हणणे मांडावे. अन्यथा उत्तरार्थी तन्वीर अलीसाहेब नाडकर यांस सदरहु अपिलाचे कामी काही एक सांगावयाचे नाही असे समजुन अपिलाची सुनावणी एकतर्फी घेऊन निर्णय दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दि.२५ माहे ६/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**अधिक्षक** — **जिल्हा व सत्र न्यायालय माणगाव**
**लिपीक** — **जिल्हा व सत्र न्यायालय, माणगाव**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथीलन खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) मिका प्रेम मेहतानी व २) प्रेम प्रितमदास मेहतानी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मापगांव | २१५/२ | ०-१५-१० | ३.५९ |
| | | पो.ख. ०-०२-८० | |
| | | ०-१७-९० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ९/७/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हौ. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक रोस्मा जॉर्ज यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमिन मिळकत**

| जुना सर्व्हे नं. /हिस्सा नं. | नवीन सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी.चौ.से.मी. | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| २६/१, २८/३ पैकी प्लॉट नं. ९ | २६/१/अ/२८/क/९ | २.७८.४३ | २७.८५ |

वर नमूद प्लॉट मिळकतीवर बांधलेले लोडबेअरींग चे घर क्षेत्र ७०.१६ चौरस मीटर (ज्याचे ग्रुप ग्रामपंचायत कोल्हारे घर क्र. ६२० असा आहे.)

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, ''लक्ष्मी सदन'', जुने एस. टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही माझे अशिल श्रीमती. अनु दास, पत्ता. रो हाउस नं. सी - आरएच-१, सुंदरम, श्री सावन नगरी, पनवेल, जि. रायगड हे नोंदणीकृत खरेदीखताने मालकी हक्काने श्री जयंत सदाशिव आंबुर्ले आणि श्रीमती पुष्पलता जयंत आंबुर्ले, रा. ई- ९२, रूम नं.६. तेजोमय सोसायटी से ७, नवीन पनवेल, ता. पनवेल यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचा विचार करीत आहेत.

**वरीलप्रमाणे परिशिष्ट**

**रो हाउस क्र.८, तळमजला अधिक एक मजला, माउंट व्हियु सोसायटी, युंगातक हाउसिंग कॉम्पलेक्स, सर्व्हे नं. १/२, मौजे चिपळे, ता. पनवेल, जि. रायगड**

तरी सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशिष्टातील वर्णन केलेल्या मिळकतीमधील हक्क, हितसंबंध व अधिकार आणि / किंवा इतर फायदे याबाबत ज्या कुणाची समझोता करार, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, चार्ज, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, वहिवाट, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन किंवा इतर बाबींद्वारे हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध असेल तर त्यांनी तशा प्रकारची हरकत, तक्रार दावा, हितसंबंध ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करावी वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा वैगरे न आल्यास वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि.०८/०७/२०२६

**किशोर ए. धाकड**
ॲडव्होकेट हायकोर्ट
ऑफिस : शॉप नं. ३२, शिवा कॉम्प्लेक्स,
प्लॉट नं. ६ सेक्टर १९, न्यु पनवेल
तालुका पनवेल, मो. नं. ९८६७०५१३३०

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुरेश गजानन राणे, वगैरे, यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/ व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे वा इतर कसल्याही कराराद्वारे तसेच दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीन मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग (गट नं.) | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| सारळ, ता. अलिबाग, जि.रायगड. | ३४८ | ०-१८-०० | ४.८७ |

अलिबाग,
दिनांक : ०९/०७/२०२६.

**राजेंद्र दा. पाटील**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन २, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड,
मो.९८२२५२८९३१
ईमेल - adv.rdpatil@gmail.com

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## शुद्धीपत्रक

तारीख २८/०६/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसमध्ये जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गांव नागांव येथील

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| २३५९ | १ | ०-५०-६० पैकी ०-४१-०० | २०=८४ |

सदर ०-४१-०० हे.आर पॉ. मिळकतीपैकी क्षेत्र ०-२२-९८ हे.आर.पॉ. क्षेत्राची मिळकत

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| २३५९ | २ | ०-४४-०० पैकी ०-३३-६० | १७=१० |

सदर ०-३३-६० हे.आर पॉ मिळकतीपैकी क्षेत्र ०-०५-२३ हे.आर पॉ. क्षेत्राची मिळकत

या मजकूराऐवजी जिल्हा रायगड तालुका अलिबाग पैकी गांव चौल येथील

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| २३५९ | १ | ०-५०-६० पैकी ०-४१-०० | २०=८४ |

सदर ०-४१-०० हे.आर पॉ मिळकतीपैकी क्षेत्र ०-२२-९८ हे.आर पॉ. क्षेत्राची मिळकत

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| २३५९ | २ | ०-४४-०० पैकी ०-३३-६० | १७=१० |

सदर ०-३३-६० हे.आर पॉ मिळकतीपैकी क्षेत्र ०-०५-२३ हे.आर पॉ क्षेत्राची मिळकत

असे वाचण्यात यावे.
तारीख: ०४/०७/२०२६

सही /-
**ॲड.संजय माधव आचार्य**
मु. पो. चौल,
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड.

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that my client has decided to purchase the below mentioned land from the landowners Mr. Suresh Gajanan Rane, etc., with whom my client has completed initial negotiations regarding sale / purchase of the said land.

Any person or persons claiming any rights or interests in the said land, or any part thereof, by way of sale, exchange, mortgage, gift, trust, inheritance, bequest, possession, lease, lien, easement or otherwise, is/are hereby called upon to communicate the same to me at my office address given below, within 15 days from the date of publishing of this notice. Within the said stipulated period if no communication is made or no objection of whatsoever nature is lodged with me, the said sale / purchase transaction of the said land, mentioned in the schedule given below, will be completed without any references or regards to any such purported claims or interests, which shall be deemed to have been waived to all intents and purposes.

SEHEDULE OF THE SAID LAND

| Village | Bhumapan Number and Upavibhag (Block No.) | Area (H.A.) | Assessment (Rs. Ps.) |
|---|---|---|---|
| Saral, Taluka Alibag, District Raigad. | 348 | 0-18-00 | 4.87 |

Alibag,
Date: 09/07/2026.

**(Rajendra D. Patil)**,
Advocate.
'Krishnavandan" -2, Brahman Ali,
Alibag, Taluka - Alibag,
District - Raigad, Pin - 402201,
Mob. 9822528931.
adv.rdpatil@gmail.com.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे टेंभरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २१ | एकुण क्षेत्र ०-९५-९० पैकी विकत देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-५२-९० | २-२९ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/०७/२०२६

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम. एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं. ०९, कोर्ट व्ह्यु बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे - अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| ३० | ४/अ/१ | २.७३.०० पो.ख ०.२९.०० | १.८७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, ''लक्ष्मी सदन'', जुने एस.टी.स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक गोपाळ बंडाचार्य जमदग्री यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे : मौजे कुशिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत :-

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १५/३ | एकुण क्षेत्र ३-४४-०० हे आर पॉ या एकुण क्षेत्रापैकी वरील मालक यांचे हिश्याचे मालकीचे एकूण क्षेत्र १-७२-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ०-९१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा. अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी- विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ०९/०७/२०२६

**वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०९४६८५४
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

दि. ८/०७/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक श्री. विवेक रघुनाथ पाटील यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे अशिल यांच्याबरोबर चालु आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| थळ, ता.अलिबाग | ३/७ | ०-०६-६० पो.ख. ०-००-२० एकूण ०-०६-८० | १.८१ |

वर नमुद केलेली मिळकत जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ८ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
**ॲड.अमर अशोक घरत**
मोबा. नं. ७७९८९३०७०८

## -: जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे आशिलांनी मौजे चिवे, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील मिळकती त्यांचे मूळ मालक श्री. शिवदत्त रामप्रसाद शर्मा यांच्याकडून त्यांच्या हिश्याची जमीन मिळकत मोबदल्यापोटी कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**-: मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे चिवे, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे क्र./गट क्र. | खाता नं. | क्षेत्र हे आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ३६/१ | १८४ | ०-६५-०० | ०.१४ |
| ३९/६ | १८४ | ०-०५-३० | ०.२८ |
| ४२/३/अ/१ | १८४ | ०-६९-६० | ५.६० |
| ४२/३/ब | १८४ | ०-०३-०० | ०.०२ |
| ४३/१ | १८४ | ०-६२-७० | ११.०६ |
| ४३/२ | १८४ | ०-२२-२० | १.०६ |
| ७२/१४ | १८४ | ०-२०-०० | ०.०६ |
| ७२/१६ | १८४ | ०-६१-०० | ०.१९ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लीज, तबदिल, धारणाधिकार, ताबा, भेट, देवाणघेवाण, विभाजन, शुल्क, ट्रस्ट, वारसा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हक्क, शिर्षक, व्याज, दावा किंवा मागणी असलेल्या आणि दावा करणाऱ्या कोणीही या प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून दहा (१०) दिवसांचे मुदतीत सही करणार यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही, तर सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेंत येईल व पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यांत येईल. हे तमाम जनतेस कळावे.

दिनांक : ०९/०७/२०२६

Mr. Vishal Singh
For M/s V R legal & Co
कार्यालय क्र. २२५, थापर कॉम्प्लेक्स,
प्लॉट क्र. ५१, सेक्टर- १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
संपर्क: +९१-९९२०३९०९५९
ईमेल आयडी : adv.vrlegal@gmail.com.

## सार्वजनिक सूचना

ही सूचना सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते की आमच्या ग्राहकांनी खाली नमूद केल्याप्रमाणे जमीन त्याच्या संबंधित मालकांकडून विकत घेण्यास सहमती दर्शविली आहे.

**सदर मालमत्तेचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:**
**मौजे : उसाले, तालुका- सुधागड, जिल्हा-रायगड**

| मालक/ विक्रेते | सर्वे/गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर.पी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भिकू मारुती वाघमारे महेंद्र बालाराम वाघमारे आणि इतर | १०/२ | ०२-०३-०० | ०-२५ |
| | १२/२ | ००-७७-९० | १३ |
| | १६/२२ | ००-२१-०० | ०-०६ |
| ओंकार दिलीप साजेकर | १६/१ | ००-१३-०० | ०-०५ |
| | १६/२१ | ००-१६-०० | ०-०५ |
| | १६/५ | ००-१४-०० | ०-०५ |
| | १६/६ | ००-०५-०० | ०-०२ |
| | १८/२ | ००-०४-०० | ०-०३ |
| विष्णू हरी पाटील | १६/१७ | ००-३०-०० | ०-०९ |
| | १७/६ | ००-२०-२० | ०-५५ |
| | १७/८ | ००-५१-४० | ०-९१ |
| जगदीश मनोहर वाघमारे सुरेश बाबू वाघमारे आणि इतर | १६/१८ | ००-३०-०० | ०-०९ |
| | १७/१ | ००-०७-१० | ०-२८ |
| | १७/३ | ००-०६-१० | ०-२५ |
| | १९/५ | ००-१०-१० | २-०६ |

कोणत्याही व्यक्तीस वरील नमूद केलेल्या कार्यालयाबाबत विक्री, विनिमय, तारण, भार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा उपभाडेपट्टा, हक्क, परवाना, हायपोथिकेशन, मालकी हक्काचा हस्तांतरण, कोणत्याही ट्रस्टखालील लाभदायी हक्क, प्रिस्क्रिप्शन हक्क, प्रथम खरेदी हक्क, करार, डिक्री, आदेश, निर्णय किंवा इतर कोणत्याही प्रकारे दावा, आक्षेप, स्वारस्य किंवा वाद असल्यास त्यांनी त्यांचे दावे/आक्षेप/वाद याबाबतची कागदपत्रे सादर करून या सूचनेच्या प्रकाशनापासून दहा (१०) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्याशी संपर्क साधावा. अन्यथा आमचे क्लायंट वरील मालकाशी विक्री व्यवहार पूर्ण करतील आणि नंतर कोणताही तृतीय पक्षाचा दावा/आक्षेप/वाद विचारात घेतला जाणार नाही.

दिनांक : ०९/०७/२०२६

Mr. Vishal Singh
For M/s V R legal & Co
कार्यालय क्र. २२५, थापर कॉम्प्लेक्स,
प्लॉट क्र. ५१, सेक्टर- १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
संपर्क: +९१-९९२०३९०९५९
ईमेल आयडी : adv.vrlegal@gmail.com

## जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे वांगणी, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत आमचे अशिल सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनिल लक्ष्मण वांद्रे यांचे कडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गट नं. | हिस्सा नं./प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ. मी. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ८ | ----- | ०.४४.४० पो.ख. ०.०३.०० एकूण ०.४७.४० | ४.६१ |

वरील वर्णन केलेल्या जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०९/०७/२०२६.

सही /-
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं. ४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

## जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे वांगणी, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत आमचे अशिल सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मोहन गुंडाप्पा सोनार यांचे कडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गट नं. | हिस्सा नं./प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ. मी. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ५ | ---- | ०.३६.०० पो.ख. ०.०३.०० एकूण ०.३९.०० | ४.३७ |

वरील वर्णन केलेल्या जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०९/०७/२०२६.

सही/-
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं.४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

# भारतीय संघाचे साहेबांसमोर लोटांगण



**। नॉटिंगहॅम । वृत्तसंस्था ।**

भारत विरुद्ध इंग्लंड पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील तिसरा सामना नॉटिंगहॅम येथे खेळला गेला. यावेळी प्रथम फलंदाजी करताना, यजमान इंग्लंडने २० षटकांत ७ बाद २०१ धावांची मजल मारली. परंतु, लक्षाचा पाठलाग करताना भारतीय संघाने अक्षरशः इंग्लंडसमोर लोटांगण घातले. प्रत्युत्तरात भारतीय संघ केवळ ७६ धावाच करु शकला. त्यामुळे भारताचा १२५ धावांनी दारुण पराभव झाला असून, हा इतिहासातील सर्वात मोठा पराभव ठरला आहे.

भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. यावेळी फिल सॉल्टने सर्वाधिक ७० धावा ठोकल्या. तर, जॉस बटलर (३६) व सॅम कुरन (नाबाद ४१) यांच्या फटकेबाजीने भारतीय गोलंदाजांना हतबल केले. त्यानंतर कर्णधार हॅरी ब्रूक (१६), जेकब बेथेल (१३), विल जॅक्स (१४), जोफ्रा आर्चर (५) यांच्या योगदानाने इंग्लंडचा संघ ७ बाद २०१ धावांचा टप्पा गाठू शकला. यावेळी भारताच्या प्रिंस यादव व हर्षित राणा यांनी प्रत्येकी २ बळी, तर अक्षर पटेलने १ बळी घेतला.

त्यानंतर इंग्लंडने दिलेल्या २०१ धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाच्या फलंदाजाने जणू लोटांगणचे घातले. लक्ष्याचा पाठलाग करताना वैभव सूर्यवंशी व अभिषेक शर्मा यांनी आक्रमक सुरूवात केली. परंतु, वैभवला यावेळी फक्त १३ धावाच करता आल्या. त्यानंतर अभिषेक शर्माही १० धावांवर बाद झाला. इशान किशन (१३), कर्णधार श्रेयस अय्यर (५) व अक्षर पटेल (१०) हे बाद झाल्याने इंग्लंडने पॉवर प्लेमध्येच भारताचा निम्मा संघ ५२ धावांवर तंबूत पाठवला. त्यामुळे टी-२० क्रिकेटच्या इतिहासात पहिल्या पाच षटकांत भारताने प्रथमच पॉवर प्लेमध्ये पाच गडी गमावले. त्यांनतर लगेच तिलक वर्मा (३) यष्टिचीत झाला. जॉस बटलच्या हातून चेंडू निसटण्यापूर्वी यष्टींवर आदळल्याने त्याला बाद दिले गेले. शिवम दुबे देखील २ धावांवर बाद झाला. पाठोपाठ अर्शदीप सिंगही (४) तंबूत परतला. त्यानंतर हर्षित राणा (९), वरून चक्रवर्थी (५) आणि पिन्स यादव (२) हे देखील स्वस्त्यात बाद झाले. त्यामुळे भारताचा डाव अवघ्या ७६ धावांवर संपुष्टात आला आणि इंग्लंडने तब्बल १२५ धावांनी भारतीय संघावर विजय मिळवला. त्यामुळे भारताचा हा सर्वात लाजीरवाणा पराभव ठरला आहे. यापूर्वी २०१९ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध भारत ८० धावांनी हरला होता. इंग्लंडने हा सामना जिंकून मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे.

● इंग्लंडने केला सुफडा साफ

● ठरला सर्वात मोठा पराभव

## भारताची निराशजनक कामगिरी

भारतीय क्रिकेट संघ सध्या आपल्या टी-२० आंतरराष्ट्रीय इतिहासातील सर्वात निराशाजनक टप्प्यातून जात आहे. भारताने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळायला सुरुवात करून जवळपास २० वर्षे झाली आहेत; तरीही, पहिल्यांदाच असा प्रसंग ओढवला आहे की संघ सलग पाच सामन्यांत एकही विजय मिळवू शकलेला नाही. विशेष म्हणजे, भारताचा शेवटचा टी-२० आंतरराष्ट्रीय विजय २०२६ च्या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात झाला होता. तेव्हापासून संघ आपल्या पुढील विजयाच्या प्रतीक्षेत आहे. ही बाब भारतीय संघाची सध्याची स्थिती अधोरेखित करते. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली भारताने आयर्लंड दौऱ्यावर दोन सामने खेळले आणि दोन्ही गमावले. त्यानंतर, इंग्लंडविरुद्धच्या मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला, तर पुढील दोन सामन्यांत भारताला पराभवाचा सामना करावा लागला.

# इजिप्तच्या तोंडचा विजय हिसकावला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



सामना हातातून निसटत चालला आहे असे वाटत असतानाच, लिओनेल मेस्सी पुन्हा एकदा अर्जेंटिनाचा तारणहार ठरला. अर्जेंटिनाने शेवटच्या ११ मिनिटांत जोरदार पुनरागमन करत २-० ची पिछाडी भरून काढली आणि ३-२ असा थरारक विजय मिळवला. या सामन्यात खेळून मेस्सीने फिफा विश्वचषकाच्या इतिहासात बाद फेरीत सर्वाधिक सामने खेळण्याच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. या विश्वचषक सामन्यात इजिप्तने सुरुवातीपासूनच अर्जेंटिनावर दबाव निर्माण केला होता. यासर इब्राहिम आणि मुस्तफा झिको यांच्या गोलमुळे इजिप्तला २-० अशी आघाडी मिळाली, त्यामुळे एक मोठा उलटफेर घडणार असे वाटत होते. तरीही, अर्जेंटिनाने हार मानली नाही. ख्रिस्टियन रोमेरोने ७९व्या मिनिटाला गोल करून पुनरागमनाची आशा जिवंत ठेवली. त्यानंतर, ८३व्या मिनिटाला लिओनेल मेस्सीने शानदार गोल करत सामना २-२ असा बरोबरीत आणला. चालू विश्वचषकातील हा त्याचा आठवा आणि विश्वचषकातील २१वा गोल ठरला. सामना 'एक्स्ट्रा टाइम'मध्ये जाणार असे वाटत असतानाच, एन्झो फर्नांडिसने 'स्टॉपेज टाइम'मध्ये निर्णायक गोल केला आणि अर्जेंटिनासाठी ३-२ असा अविस्मरणीय विजय निश्चित केला.

## कबड्डी संघटनेचे पुरस्कार जाहिर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

कबड्डीसाठी आयुष्य वेचणाऱ्या दिनकर पाटील आणि शकुंतला खटावकर यांना महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचा प्रतिष्ठेचा 'कबड्डी महर्षी शंकरराव साळवी कबड्डी जीवन गौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेने कबड्डी दिनाचे औचित्य साधत विविध पुरस्कारांची घोषणा केली. कबड्डीसाठी योगदान, कार्यकर्ते, पंच, प्रशिक्षक, पत्रकार, तसेच उदयोन्मुख खेळाडूंच्या कार्यकर्तृत्वाचा १५ जुलैला रत्नागिरी येथे गौरव होणार आहे.

## गोव्यात रंगणार 'बटरफ्लाय युटीटी'

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारताचे दिग्गज टेबल टेनिसपटू आणि जगातील काही सर्वोत्तम खेळाडू गोव्यात आपली चमक दाखवण्यासाठी सज्ज झाले आहेत. 'बटरफ्लाय अल्टिमेट टेबल टेनिस' सीझन ७ची सुरुवात गुरुवारी (दि.९) होणार आहे. या हंगामाची सुरुवात एका जबरदस्त 'वेस्टर्न डर्बी'ने डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियमवर होणार आहे. यजमान आणि दोन वेळा विजेतेपद पटकावणारा 'डेम्पो गोवा चॅलेंजर्स' संघाचा सामना गतविजेत्या 'यू मुंबा टीटी' संघाशी होणार आहे. पुढील १८ दिवस सात संघ या प्रतिष्ठित विजेतेपदासाठी झुंज देणार असून, अंतिम सामना दि.२६ जुलै रोजी खेळवला जाणार आहे. बटरफ्लाय यूटीटी या हंगामात एआय-आधारित टेबल टेनिस रिव्ह्यू प्रणाली देखील सादर करणार आहे. व्हिडिओ रिव्ह्यू तंत्रज्ञानाचा अवलंब करणाऱ्या जगातील मोजक्या लीगपैकी ही एक लीग ठरणार आहे. लीगचे अधिकृत तंत्रज्ञान भागीदार असलेल्या गुरुग्राममधील स्तुपा स्पोर्ट्सने विकसित केलेली ही प्रणाली, वादग्रस्त निर्णयांची पडताळणी २० सेकंदांपेक्षा कमी वेळेत पूर्ण करेल. प्रत्येक सामन्यात प्रत्येक संघाला तीन टीटीआर रिव्ह्यूज मिळतील, त्यामुळे हा एक नवीन अनुभव असणार आहे.

## कटकारस्थान करूनही यजमानांना बाहेरचा रस्ता

**विनायक दळवी**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतून यजमान अमेरिकेचा संघ देखील आता बाहेर झाला आहे. सर्व वादविवाद आणि राष्ट्राध्यक्षांच्या नेतृत्वाखालील कारस्थानांनंतर, अखेर अमेरिकेच्या प्रतिष्ठेचा मोठा ऱ्हास झाला. विश्वचषकाच्या बाद फेरीच्या सामन्यापूर्वीच्या अत्यंत विचित्र घडामोडींनंतर, जिथे एकामागोमाग एक वक्तव्ये केली जात होती. त्यानंतर संतप्त बेल्जियम संघाने सोमवारी सायंकाळी अत्युच्च पातळीवर अमेरिकेला विश्वचषकातून बाहेर काढले.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या आवाहनाला प्रतिसाद देणारे फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो, हे सर्व पाहण्यासाठी आपल्या व्हीआयपी आसनावर उपस्थित होते, हे अगदी साजेसे वाटले. फोलारिन बालोगुनवरील एका सामन्याची बंदी उठवण्यावरून झालेल्या अभूतपूर्व गोंधळामुळे, तो या सामन्यासाठी उपलब्ध झाला होता, आणि त्यामुळे या विश्वचषकाच्या क्रीडा सचोटीवर एक काळी छाया पसरली होती. जागतिक स्तरावर मैदानातील निर्णयांमध्ये ढवळाढवळ करण्याचा हा एक अभूतपूर्व प्रकारचा राजकीय हस्तक्षेप होता. पण कधीकधी, खेळ स्वतःच्याच पद्धतीने काव्यात्मक न्याय देतो, तो हा असा. सोमवारी बेल्जियमकडून विश्वचषक स्पर्धेतून बाहेर पडलेल्या अमेरिकेच्या सामन्यात फोलारिन बालोगुनची कामगिरी नगण्य होती. किंबहुना, पहिल्या सत्रात चेंडूला सर्वात कमी म्हणजे फक्त १० वेळा स्पर्श करणारा तो एकमेव खेळाडू होता. आणि हे अत्यंत समर्पक होते की, अमेरिकेच्या या स्ट्रायकरबद्दल इतकी चर्चा सुरू असताना, अखेरीस बेल्जियमचाच २५ वर्षीय फॉरवर्ड चार्ल्स डी केटेलेअर जो बालोगुनपेक्षा पाच महिन्यांनी मोठा आहे, त्यानेच ते महत्त्वाचे गोल केले. त्यामुळे लॉस एंजेलिसमध्ये त्याच्या संघाला उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळाला. गेल्या काही दिवसांच्या गोंधळात टाकणाऱ्या खेळानंतर, आता बेल्जियम संघाची लढत स्पेनशी होणार आहे.

त्यामुळे अमेरिकेचे मुख्य प्रशिक्षक मॉरिसिओ पोचेटिनो यांच्यासाठी, ज्या मोहिमेकडून मोठ्या अपेक्षा होत्या, तिचा हा सर्वात निराशाजनक शेवट आहे. सह-यजमान मेक्सिको आणि कॅनडा यांच्याप्रमाणेच अमेरिकन संघ देखील अंतिम १६ च्यापुढे जाऊ शकलेले नाही. त्यामुळे या विश्वचषकातील उत्तर अमेरिकेचा सहभाग संपला आहे.

## सप्टेंबरमध्ये भारताचा बांगलादेश दौरा?




**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा बांगलादेश दौरा आधी ऑगस्ट २०२५ मध्ये होणार होता; परंतु, राजकीय तणावामुळे तो पुढे ढकलण्यात आला होता. आता भारतीय संघ सप्टेंबरमध्ये ६ सामन्यांच्या मालिकेसाठी बांगलादेशचा दौरा करू शकतो. मात्र, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने अद्याप या मालिकेबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. भारत आणि बांगलादेश यांच्यातील ही मालिका यशस्वी करण्यासाठी बांगलादेश क्रिकेट बोर्डाने पुढाकार घेतला आहे. बीसीबीच्या सुरक्षा समितीचे अध्यक्ष सय्यद इब्राहिम अहमद यांनी, जर भारतीय संघ बांगलादेशला आला, तर त्यांच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेतली जाईल, असे स्पट केले. बीसीबीने नुकत्याच मागवलेल्या घरगुती आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या ब्रॉडकास्टिंग अधिकारांच्या निविदांमध्ये भारत विरुद्धच्या या प्रस्तावित मालिकेचाही समावेश आहे. तसेच, सप्टेंबर २०२६ च्या सुरुवातीच्या काळात भारतीय संघाचे कोणतेही आंतरराष्ट्रीय सामने ठरलेले नाहीत, त्यामुळे ही मालिका होऊ शकते.

## स्पर्धेतून बाहेर पडल्यावर इजिप्तची रडारड

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

फिफा विश्वचषकात 'राऊंड ऑफ १६' चे सामने पार पडले. त्यामध्ये मंगळवारी (दि.७) अटलांटा स्टेडियममवर अर्जेंटिना आणि इजिप्त संघ भिडले. या सामन्यात अर्जेंटिनाने स्पर्धेच्या इतिहासातील जबरदस्त पुनरागमन करण्याची कामगिरी केली आणि सामना ३-२ ने जिंकला. परंतु, या सामन्यात घडलेल्या वादग्रस्त निर्णयांबद्दल इजिप्त संघाचे मुख्य प्रशिक्षक होसाम हसन आणि स्टार फॉरवर्ड मुस्तफा झिको यांनी सामन्यानंतर सामना अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी अर्जेंटिनाला झुकते माप दिल्याचा आरोप करत ही स्पर्धा अर्जेंटिना आणि लिओनेल मेस्सी यांच्यासाठीच होती, असा दावा केला. इजिप्तने १-० अशी आघाडी घेतल्यानंतर व्हीएआरच्या हस्तक्षेपामुळे त्यांचा दुसरा गोल नाकारण्यात आला, असा दावा हसन यांनी केला आहे. तसेच, त्यांनी असेही म्हटले की, एन्झो फर्नांडिसने अर्जेंटिनाचा विजयी गोल करण्याच्या काही क्षणांआधी, स्टॉपेज टाइममध्ये त्याच्या संघाला पेनल्टी दिली जायला हवी होती. त्यामुळे "मी पुन्हा कधीही विश्वचषक पाहणार नाही, कारण या स्पर्धेत न्याय नाही", असे इजिप्तच्या प्रशिक्षकाने जाहीर केले.

# दिल्लीत महाराष्ट्राचा डंका

**। पुणे । प्रतिनिधी ।**



भारतीय शालेय स्पर्धा महासंघाच्या शालेय क्रीडा स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपदाची हॅट्‌ट्रिकचा पराक्रम महाराष्ट्राने केला आहे. यावेळी विजेतेपदकाचा करंडक क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या आयुक्त दीपक सिंगला यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला आहे.

नुकत्याच दिल्लीत संपन्न झालेल्या भारतीय शालेय स्पर्धा महासंघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत महाराष्ट्राला विजेतेपदाच्या करंडकाने गौरविण्यात आले. शालेय खेळ महासंघाचे अध्यक्ष दिपक कुमार यांच्या हस्ते उपसंचालक संजय सबनीस, उपसंचालक उदय जोशी, सहाय्यक संचालक चंद्रशेखर साखरे व क्रीडा अधिकारी अरुण पाटील यांनी राज्याचावतीने विजेतेपदाचा करंडक स्वीकारला. याप्रसंगी देशभरातील राज्य प्रतिनिधी उपस्थित होते. याबरोबरच महाराष्ट्र राज्याने शालेय आशियाई व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघाच्या निवड चाचणीचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल ही राज्याचा गौरव करण्यात आला.

## शालेय स्पर्धेत विजेतेपदाची हॅट्‌ट्रिक

गतविजेत्या महाराष्ट्राने अपेक्षेप्रमाणे सर्वोत्तम कामगिरी करीत ६९ व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतही महाराष्ट्राने सर्वसाधारण विजेतेपदाचा पराक्रम केला आहे. १८७ सुवर्ण, १६९ रौप्य, १९० कांस्य अशी एकूण ५४६ पदकांची लयलूट करीत महाराष्ट्राने अव्वल स्थानाचे शिखर सर केले आहे. या स्पर्धेत महाराष्ट्राचे २५२८ क्रीडापटू सहभागी झाले होते. ४२ खेळातील १५५ क्रीडा प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंच्या यशाचा डंका देशभरात वाजला आहे. तसेच, शालेय गट, १८ वर्षांखालील युवा गट व वरिष्ठ गटात विजेतेपदाची हॅट्‌ट्रिक महाराष्ट्राने केली आहे.

## माजी वेगवान गोलंदाचे निधन



**नवी दिल्ली :** अफगाणिस्तान क्रिकेटला मोठा धक्का बसला आहे. संघाचा माजी वेगवान गोलंदाज शापूर जद्रान यांचे मंगळवारी (दि.७) दीर्घ आजाराने निधन झाले. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने त्यांच्या निधनाची अधिकृत माहिती दिली आहे. शापूर जद्रान गेल्या काही महिन्यांपासून नवी दिल्लीतील रुग्णालयात उपचार घेत होता. त्यांना हेमोफॅगोसाइटिक लिम्फोहिस्टिओसायटोसिस हा दुर्मिळ आणि जीवघेणा आजार झाला होता. या आजारात शरीराची रोगप्रतिकारक शक्तीच अतिसक्रिय होऊन शरीरातील अवयवांवर परिणाम करते. त्याची प्रकृती अत्यंत गंभीर होती आणि तो आयसीयूमध्ये जीवनाशी झुंज देत होता. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने सोशल मीडियावर शोक व्यक्त करत, "अत्यंत दुःखद मनाने आम्ही अफगाणिस्तानचस माजी वेगवान गोलंदाज शापूर जद्रान याच्या निधनाची बातमी जाहिर करत आहोत."असे म्हटले आहे.

# धुरंदर चषकाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**



कोंडरान फायटर यांच्यावतीने धुरंदर चषक २०२६ पावसाळी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला क्रिकेटप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत एकूण १० संघांनी सहभाग नोंदवत खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडविले. पावसाळी वातावरण असूनही सर्व सामने उत्साहात आणि क्रीडाभावनेत पार पडले.

या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सचिन ११ संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. साईराज बी संघाने उपविजेतेपद मिळविले, तर साई ११ संघाने तृतीय क्रमांकावर समाधान मानले. विजेत्या व उपविजेत्या संघांना आकर्षक चषक व सन्मानचिन्हे प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी स्पर्धेतील सर्वांत भावनिक क्षण अनुभवायला मिळाला. प्रथम क्रमांकाचा सचिन ११ आणि द्वितीय क्रमांकाचा साईराज बी या दोन्ही संघांनी आपल्या विजयाचे चषक स्वर्गीय अर्जुन घरत यांच्या पवित्र स्मृतीस समर्पित केले. या कृतीमुळे उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले असून, दोन्ही संघांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी कोंडरान फायटरच्या सर्व पदाधिकारी, आयोजक, पंच, स्वयंसेवक तसेच सहकार्य करणाऱ्या नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले.




## तब्बल २३ वर्षानंतर मालिका जिंकली

**। त्रिनिनाद । वृत्तसंस्था ।**

वेस्ट इंडिजने तब्बल २३ वर्षानंतर श्रीलंकेविरुद्धची कसोटी मालिका जिंकली आणि जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेत पाकिस्तानला त्यांची जागा दाखवून दिली. दुसरी कसोटी अनिर्णित राहिल्याने यजमान विंडीजला १-० अशी मालिका जिंकता आली. या विजयासह ते गुणतालिकेत १६.६७ टक्क्यांसह आठव्या क्रमांकावर आले असून, त्यांनी पाकिस्तानला शेवटच्या क्रमांकावर ढकलले आहे

श्रीलंकेने पहिला डाव ९ बाद ५४९ धावांवर घोषित केल्यानंतर वेस्ट इंडिजने ४९९ धावांपर्यंत मजल मारली होती. श्रीलंकेने दुसरा डाव ९ बाद २५१ धावांवर घोषित करून यजमानांसमोर विजयासाठी ३०२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात विंडीजने बिनबाद १०९ धावा करून सामना ड्रॉ राखला. अँटिग्वामधील बरोबरीच्या सामन्यामुळे वेस्ट इंडिजला मालिका १-० ने जिंकण्यास मदत झाली आणि गुणतालिकेत त्यांना चार गुणही मिळाले. बरोबरीत सुटलेल्या सामन्यासाठी श्रीलंकेलाही चार मौल्यवान गुण मिळाले. दरम्यान, वेस्ट इंडिजने घरच्या मैदानावर २०२२ नंतर पहिली कसोटी मालिका जिंकली आहे. चार वर्षांपूर्वी त्यांनी बांगलादेशवर २-० असा विजय मिळवला होता. परंतु, श्रीलंकेविरुद्ध मालिका जिंकण्यासाठी त्यांना २३ वर्ष वाट पाहावी लागली. २००३ मध्ये त्यांनी घरच्या मैदानावर दोन कसोटी सामन्यांच्या मलिकेत १-० असा विजय मिळवला होता. या निकालानंतर दोन्ही संघांच्या गुणतालिकेत कोणताच बदल झाला नाही. श्रीलंका सहाव्या स्थानावर कायम राहिले.

**अंतिम १६ चा थरार संपला | फुटबॉल चाहत्यांची उत्कंठा वाढली**

# आठ संघांमध्ये 'काँटे की टक्कर'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



फिफा विश्वचषकाच्या उपउपांत्यपूर्व फेरीत फुटबॉल चाहत्यांना अखेरच्या क्षणातील विजयी गोल, धक्कादायक निकाल, अविश्वसनीय पुनरागमन आणि भावनिक निरोप असे सर्वकाही पाहायला मिळाले. आता अंतिम १६ चा थरार संपला असून, ही स्पर्धा अंतिम आठ संघांपर्यंत मर्यादित झाली आहे.

अंतिम १६ मधील पहिल्या सामन्यात मोरोक्कोने यजमान कॅनडाचा पराभव करून बाद फेरीची सुरुवात दमदार केली होती. तर, कॅनडाचा संघ इतिहासात प्रथमच विश्वचषकाच्या बाद फेरीत पोहचला होता. दुसऱ्या सामन्यात पॅराग्वेने फ्रान्सला कडवी झुंज दिली. परंतु, अखेरीस किलियन एम्बाप्पेच्या पेनल्टीच्या जोरावर फ्रान्सने विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरी गाठली. त्यानंतर या फेरीतील सर्वात मोठा धक्का न्यू जर्सी येथे बसला. याठिकाणी नॉर्वेने ब्राझीलचा मोठा पराभव केला. एर्लिंग हालांडच्या दोन गोलांमुळे पाच वेळच्या विजेत्या ब्राझीलचा प्रवास संपला. आणि त्यानंतर नेयमार ज्युनिअरने आपल्या अखेरच्या विश्वचषक सामन्यात पेनल्टीवर गोल करत निरोप घेतला. चौथ्या सामन्यात इंग्लंडने यजमान मेक्सिकोविरुद्ध नाट्यमय विजय मिळवला. त्यामुळे मेक्सिकोही स्पर्धेतून बाहेर झाले. त्यानंतरच्या सामन्यात आणखी एका महान खेळाडूचा विश्वचषक प्रवासही संपला. अतिरिक्त वेळेत मिकेल मेरिनोच्या गोलमुळे स्पेनने पोर्तुगालला पराभूत केले आणि क्रिस्टियानो रोनाल्डोच्या गौरवशाली विश्वचषक कारकिर्दीचा भावनिक शेवट झाला. सहाव्या सामन्यात यजमान अमेरिका व बेल्जियमच्या सामन्यापूर्वी फोलारिन बालोगुनवरील रेड कार्ड निलंबन मागे घेण्याच्या निर्णयावरून प्रचंड वाद निर्माण झाला होता. मात्र, बेल्जियमने अमेरिकावर ४-१ असा दणदणीत विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यानंतरच्या सामन्यात गत विजेता अर्जेंटिनाने इजिप्तविरुद्ध स्पर्धेतील सर्वात संस्मरणीय पुनरागमन केले. २-० ने पिछाडीवर असताना लिओनेल मेस्सीच्या प्रेरणादायी खेळीमुळे अर्जेंटिनाने १३ मिनिटांत तीन गोल करत विजय मिळवला. शेवटच्या सामान्यामध्ये स्वित्झर्लंडने कोलंबियाचा पेनल्टी शूटआउटमध्ये पराभव करून अंतिम आठ संघांची यादी पूर्ण केली. त्यामुळे आता उपांत्यपूर्व फेरीत मोरोक्को विरुद्ध फ्रान्स, स्पेन विरुद्ध बेल्जियम, नॉर्वे विरुद्ध इंग्लंड आणि स्वित्झर्लंड विरुद्ध अर्जेंटिना असे सामने रंगणार आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)